123

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास विभाग

# शासकीय आश्रमशाळामधील उपलब्ध सोयी / सुविधा संबंधी मूल्यमापन अभ्यास अहवाल.


## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे – ४११००१.


१९९५

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी "आश्रमशाळा" योजना सुरू केली. शासकीय आश्रमशाळेत मुलांची राहण्याची, जेवण्याची सोय करण्यात येते. तसेच त्यांना वेगवेगळया सुविधा पुरविण्यात येतात. त्यामध्ये कपडे, वह्या, पुस्तके, शालेय साहित्य, खेळाचे साहित्य, क्रिडांगण, वाचनालय, व्यायामशाळा इ. सुविधांचा समावेश होतो. तसेच, आश्रमशाळा उघडण्यासाठी वीज, पाणी, रस्ते, इमारत, दळणवळणाची सोय इ. भौतिक सुविधांची सोय अत्यावश्यक असते.

वरील प्रमाणे विविक्षित सोयी व सुविधा शासकिय आश्रमशाळेतील मुला-मुलींना खरोखरच मिळतात का ? आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना या सोयी उपयुक्त आहेत का ? उपलब्ध असणा-या सोयी पुरेश्या आहेत का ? या विषयावरचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी संस्थेने शासकिय आश्रमशाळांमध्ये असणा-या वेगवेगळया सुविधांची उपलब्धता कितपत आहे याचा अभ्यास अहवाल करण्याचे ठरविले. त्याकरिता महाराष्ट्रातील सहयाद्री व गोंडवन या भागातील बहुतेक सर्व आदिवासी जिल्हयांचा समावेश होईल अशा काही शासकिय आश्रमशाळांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. तसेच त्यापैकी काही जिल्हयांतील आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन मुख्याध्यापक, आश्रमशाळेतील मुले-मुली व पालकांच्या मुलाखतीव्दारे माहिती गोळा करण्यात आली आहे.

सदर मूल्यमापन अभ्यास अहवालाचे काम या संस्थेतील श्री. डा.एस.मोडगा, संशोधन सहाय्यक व श्री. आर.आर.साबळे, अन्वेषक यांचेकडे सोपविले होते. त्यांना श्रीमती घोडे, संशोधन अधिकारी व श्री. देवळे. संशोधन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. सदर मूल्यमापन अहवाल सुधारीत स्वरुपात सादर करण्याचे काम श्री. एस.आर.शेवकरी, संशोधन सहाय्यक (ए.क्षे.वि.का) यांचेकडे सोपविण्यात आले. सदरचे काम त्यांनी श्री. प्रकाश वाणी, उपसंचालक (मू. व सं) यांचे देखरेखाली पूर्ण केले.

सदर अहवाल आदिवासी क्षेत्रामध्ये काम करणा-या प्रशासकिय अधिका-यांना, संशोधकांना मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

पुणे.

दिनांक : 7-8-95

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे 1.

अनुक्रमणिका


| अनु.क्र. | प्रकरण | तपशिल | पान क्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| | 1 | महाराष्ट्र राज्यातील शासकिय आदिवासी आश्रमशाळा योजना - आश्रमशाळेतील सोयी/ शैक्षणिक सवलती व सुविधा यावर दृष्टीक्षेप... | 1 | 4 |
| | 2. | क्षेत्रिय पहाणीची उद्दिष्टये - नमुना निवड पद्धतीचे विश्लेषण | 5 | 9 |
| | 3. | क्षेत्रिय पहाणीतील माहिती संकलन व तिचे पृथःकरण | 10 | 37 |
| | 4. | क्षेत्रिय पहाणीअंतर्गत निरिक्षण व निष्कर्ष. | 38 | 43 |
| | 5. | सूचना व शिफारशी | 44 | 51 |
| | 6 | आलेख | 52 | 53 |
| परिशिष्टे - | | | | |
| | 1. | आश्रमशाळा योजना संबंधात शासन निर्णय | 54 | 69 |
| | 2. | क्षेत्रिय पहाणीसाठी तयार केलेली प्रपत्रे .. | 70 | 78 |


xxxxxxxxxxx

# प्रकरण क्र. 1

## महाराष्ट्र राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा योजना-आश्रमशाळेतील सोयी, शैक्षणिक सवलती व सुविधा यावर दृष्टीक्षेप -

### आदिवासी आश्रमशाळा संकल्पना :-

1.1 फार वर्षापूर्वी भारतामध्ये "गुरुकुल" ही शिक्षण संस्था अस्तित्वात होती. गुरुंच्या सानिध्यात आश्रमामध्ये राहून शिक्षण घेणे अशी ही शिक्षण पद्धती असे. गुरुंच्या आश्रमामध्ये राहून छात्रांना निरनिराळया व्यावहारिक ज्ञानाचे व व्यवसायांचे शिक्षण मिळे. याबरोबरच भारतीय संस्कृती, ज्ञान, नितिमत्ता यांचेही शिक्षण मिळून त्यांची व परिणामतः समाजाची बौद्धीक व नैतिक पतळी उंच करण्यामध्ये या आश्रमीय जीवनपद्धतीचा व्यापक सामाजिक दृष्टीकोनातून समाजास लाभ होई.

1.2 कालांतराने ही गुरुकुलपद्धती लयास गेली तरी या शिक्षणसंस्थेची परंपरागत छाप समाज विसरु शकला नाही. याच पार्श्वभूमिवर महाराष्ट्रामध्ये आदिवासी मुलां-मुलींसाठी आश्रमशाळा सुरु करणे ही योजना राबविण्याचे ठरविण्यात आले. आश्रमशाळा म्हणजे संस्कारमय शाळा. इतर शाळांपसून या शाळांची ध्येय, धोरणे भिन्न आहेत. या प्रामुख्याने निवासी शाळा असल्यामुळे शिक्षण सात्याने नियोजित करुन दिलेली शिक्षण पद्धती तर या शाळांमधून राबवायची आहेच परंतु सर्व निवासी छात्र संस्कारमय कसे बनतील याकडेही तेथाल गुरुजनांना काळजीपूर्वक लक्ष पुरवावयाचे आणि त्यांना त्याप्रमाणे कार्य करायचे आहे. तसेच शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्राचा विकासकरणे हे आश्रमशाळेचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

1.3 **आश्रमशाळेची मूलभूत योजना :-** महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभागातर्फे शासन निर्णय क्र.बीसीपी-1072/13893-जो/, दिनांक 14-8-1972 नुसार आश्रमशाळा समूहांची योजना मंजूर करण्यात आली होती.

1.4 **आश्रमशाळा :-** आश्रमशाळा ही एक निवासी प्राथमिक व माध्यमिक शाळा असून शाळेमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची जेवणाची, राहण्याची व शिक्षणाची मोफत सोय शासनामार्फत करण्यात येते. नवीन आश्रमशाळा उघडल्यानंतर प्रथमतः 120 विद्यार्थ्यांची सोय वसतिगृहात केली जाते. दरवर्षी एकेक वर्ग वाढून इयत्ता 7 वी पर्यंत प्राथमिक शिक्षण दिले जाते. काही बाहेरील विद्यार्थ्यांना देखिल आश्रमशाळेत प्रवेश दिला जातो. त्यांना " डेस्कॉलर" म्हणतात. डेस्कॉलरला शासनामार्फत 1 गणवेष, वह्या, पुस्तके, पाटी इ. वस्तू पुरविल्या जातात व तसेच मोफत शिक्षण दिले जाते.

परंतु आश्रमीय विद्यार्थ्यांना 2 गणवेष, वह्या, पुस्तके, पाटी, अंथरुण पांघरुणाचे साहित्य व शिक्षण मोफत दिले जाते.

1.5 **बालवाडी** :- आश्रमशाळेला जोडूनच एक बालवाडी असते. 30 ते 40 मुलामुलींना बालवाडीत प्रवेश दिला जातो. त्यासाठी प्रशिक्षित व पूर्ण वेळ शिक्षिका असतात. बालवाडीसाठी आवश्यक ते साहित्य शासन मोफत देते.

1.6 **कृषी प्रत्यक्षित केंद्रे** :- या योजनेअंतर्गत अंदाजे 50 एकर (20 हेक्टर) जमिनीचे कृषि क्षेत्रात रुपांतर करून त्यांचा फायदा आश्रमशाळा परिसरातील आदिवासी शेतकरी आणि आश्रमवासीय विद्यार्थ्यांना कसा होईल ज्याद्वारे सुधारित शेतीपद्धती, बी-बीयाणे आणि कीटकनाशके यांचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन केले जाते.

1.7 **पशु संवर्धन केंद्र** :- या योजनेअंतर्गत 10 गाई किंवा म्हशी पुरविल्या जातात. त्यापासून मिळणारे दूध आश्रमवासीय विद्यार्थ्यांना दिले जाते. दुभत्या जनावरांची काळजी कशी घ्यावी याचे ज्ञान आश्रमीय विद्यार्थ्यांना मिळते.

1.8 **प्राथमिक आरोग्य केंद्र** :- 2 किंवा 3 शासकिय आश्रमशाळेसाठी 1 प्राथमिक आरोग्य केंद्र असावे अशी तरतूद आहे. वर्ग 2 चा वैद्यकिय अधिकारी व त्यास मदत करण्यासाठी योग्य तो वैद्यकिय कर्मचारीवृंद या केंद्रासाठी असेल व वैद्यकिय सोयींनी युक्त असे शासकिय वाहन देण्यात येते.

1.9 **व्यवसाय पूर्व प्रशिक्षण केंद्र** :- या केंद्रामध्ये दरवर्षी 30 प्रशिक्षणार्थींना प्रवेश दिला जातो. सुतारकाम, लाकूडकाम, लोहारकाम, शिलाईकाम, बांबूकाम इत्यादी प्रकारचे त्या त्या विभागाला सोयीचे होईल असे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणार्थींना मासिक विद्यावेतन दिले जाते.

1.10 वरीलप्रमाणे विविध उपक्रम क्षेत्र विकास योजना - आश्रमशाळा समूह योजनेअंतर्गत सुरु करावेत असे शासकिय धोरण होते. परंतु आश्रमशाळा समूहाकरिता आवश्यक असणारी जमीन मिळविण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या त्यामुळे मूळ योजनेचा शासनाने पुनर्विचार करून महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीपी-1077/5183/15, दिनांक 14-9-77 नुसार योजना फक्त शिक्षणापुरती मर्यादित ठेवण्यात आली. त्यामुळे उपरोक्त योजनेमधील कृषि प्रत्यक्षिक केंद्र, पशु संवर्धन केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, व्यवसाय पूर्व प्रशिक्षण केंद्र या उपयोजना बंद करण्यात आल्या व आश्रमशाळा, बालवाडी व वसतिगृह एवढेच उपक्रम चालू ठेवण्यात आले.

1·11 महाराष्ट्र राज्यात सन 1990-91 अखेर एकूण 387 शासकिय आश्रमशाळा उघडण्यात आल्या होत्या. त्यापैकी 313 आदिवासी उपयोजनेमध्ये तर 74 आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर उघडण्यात आल्या आहेत. आदिवासी विभागवार स्थिती पहता सहयाद्री विभागात 250 व गोंडवन विभागात 137 अशा एकूण 387 शासकीय आश्रमशाळा कार्यान्वित आहेत. 7 वी च्या पुढील वर्ग असलेल्या 132 (माध्यमिक) पेस्ट बेसिक आश्रमशाळा आहेत.

### आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे संस्थेचा सहभाग :

1·12 आदिवासी क्षेत्रातील कोणत्याही कल्याणकारी योजना फलद्रुप होण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे सहाय्य करते, संस्था प्रत्यक्षपणे कोणतीही योजना राबवित नाही पण योजना राबविण्याच्या प्रक्रियेत शक्य असेल ते सर्वोतोपरी सहाय्य करते.

1·13 आश्रमशाळेचे मूल्यमापन या संस्थेने केले होते त्यावेळी ही योजना समाधानकारकरित्या राबविली जात नाही असे या संस्थेच्या दृष्टीत्पत्तीस आले. या योजनेचा हेतू उद्दिष्ट, कार्य करण्याची पद्धत, व्यवस्थापन या गोष्टींचे सम्यक् ज्ञान जोपर्यंत कर्मचारी वर्गास होत नाही तोपर्यंत या योजनेत परिणामकारकरित्या बदल घडून येणे अशक्य आहे असे वाटल्यावरून या संस्थेने मे, 1982 पासून आश्रमशाळेतील महत्वाचे कर्मचारी व घटक (1) मुख्याध्यापक व (2) वसतिगृह अधिक्षक यांचेसाठी या संस्थेमध्ये प्रशिक्षण वर्ग (प्रत्येकी 15 दिवसांचा) आयोजित केले. या किमान प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना नित्यापयोगी पडणारे व परिणामी प्रगतीकडे नेणारे अद्यावत मार्गदर्शन संस्थेतील व संस्थेबाहेरिल तज्ञ लोकांकडून दिले जाते. कार्याची इतिकर्तव्यता योग्य दिशेने व्हावी, मुले शिक्षित, सुशिक्षित व सुसंस्कृत व्हावीत यासाठी काही ध्येय धोरणे असावीत, व्यवस्थापन कसे असावे याविषयी अल्प काळात मोलाचे प्रशिक्षण देण्यात येते.

1·14 1954-55 ते 1989-90 या कालावधीमध्ये आश्रमशाळांची भरीव प्रगती होत गेली. आश्रमशाळेच्या कामकाजावर विविध सर्वेक्षणेही घेण्यात आली. सन 1991-92 मध्ये संस्थेने हे विविध अंगी सर्वेक्षण हाती घेतले आहे. खालील तीन विषयांमधून हे सर्वेक्षण घेण्यात आले आहे.

1. शासकिय आश्रमशाळांची विद्यार्थ्यांची गळतीबाबत पहाणी व त्यावर सुचविण्यात येणारे उपाय,

2. आश्रमशाळांमध्ये असलेल्या विविध सेवा/सुविधांची पहाणी,

3. शिक्षण विभागाच्या अधिका-यांना, वैद्यकिय अधिका-यांनी व इतर तपासणी अधिका-यांनी आश्रमशाळांना द्यावयाच्या भेटी बाबतची पहाणी.

1.15 दरवर्षी आश्रमशाळेच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. त्याचप्रमाणे हल्ली अनुदानित आश्रमशाळांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे शासकिय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये सोयी पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहेत किंवा कसे ? शासनाने ज्या सोयी/सुविधा प्रदान केल्या आहेत त्यांची योग्य अंमलबजावणी होते किंवा कसे याशिवाय सर्वसाधारणपणे सध्या कोणत्या सोयी सुविधा उपलब्ध आहेत. आश्रमशाळेमध्ये मान्य सेवकवर्ग किती आहे, रिक्त पदे कोणकोणती आहेत, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे साहित्य योग्य रितीने पुरविण्यात आले आहे काय ? या साहित्यामध्ये साबण, तेल, युनिफॉर्म, अंथरुण, पांघरुण, पेटी, ताट, वाटी तांब्या इत्यादींचा समावेश, खेळाच्या साहित्याचाही समावेश असू शकेल. आश्रमशाळांच्या इमारतीबाबत व इतर अंतर्गत सोयी सुविधा पुरविल्या जातात काय याची प्रत्यक्ष पहाणी करणे. आश्रमशाळेमध्ये मूलभूत सोयी कोणकोणत्या उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकिय सुविधा व सोयी, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिका-यामार्फत वेळेवर व योग्य रितीने उपलब्ध होतात काय ? वैद्यकिय सेवा वेळेवर व योग्य रितीने उपलब्ध होत नसेल तर त्याची संभाव्य कारणे काय असू शकतील यासंबंधी क्षेत्रिय पहाणीद्वारे मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करणे गरजेचे वाटते.

1.16 अशा रितीने शासनाच्या सूचनेप्रमाणे आश्रमशाळेमधील सोयी/सुविधाबाबतचा मूल्यांकन अभ्यास अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेने हाती घेण्याचे ठरविले.

ꚙꚙꚙꚙꚙꚙꚙꚙꚙꚙꚙ

## प्रकरण - 2

## क्षेत्रिय पहणीची उद्दिष्टये, नमुना निवड पध्दती विश्लेषण

2·1 महाराष्ट्र शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी शासकीय आश्रमशाळा सुरु केल्या आहेत· शासकीय आश्रमशाळांमार्फत आदिवासींना शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात व त्यायोगे आदिवासींची शैक्षणिक व आर्थिक प्रगती व्हावी हा यामागील प्रमुख उद्देश आहे· आश्रमशाळा सुरु केल्यानंतर त्यालगतच्या परिसराचा सर्वांगिण विकास व्हावा हा दोखल उद्देश त्यामागे आहे· शैक्षणिक विकास साधल्यानंतर वीज पुरवठा, सुधारित कृषितंत्रज्ञान, वाहतुकीची साधने इत्यादी गोष्टी साध्य करण्यासाठी त्या भागातील आदिवासी प्रयत्नशील राहतील अशी अपेक्षा आहे· आश्रमशाळेमध्ये राहणा-या मुलांना जेवण, राहण्याची सोय, औषधोपचाराची सोय, अंथरुण पांघरुणाची सोय, पाट्या, पुस्तके व वह्या, स्नानगृहे, वसतीगृह व शौचालये इत्यादी सोयी सुविधा पुरविण्यात येतात· परंतु वरीलप्रमाणे सोयी सुविधा प्रत्यक्षपणे आश्रमशाळेत अस्तित्वात आहेत का ? आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना ह्या सोयी उपयुक्त आहेत का ? उपलब्ध असलेल्या सोयी पुरेश्या आहेत का ? यांची सत्य परीस्थिती जाणून घेण्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळेमध्ये असणा-या वेगवेगळ्या सुविधांचे मूल्यमापन करुन हा अहवाल तयार करण्याचे या संस्थेने ठरविले· सदर मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेवण्यात आली·

2·2 मूल्यमापन अभ्यास अहवालाची उद्दिष्टये :-

1· आश्रमशाळांमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांचा अभ्यास करणे व मूलभूत माहिती तयार करणे·

2· आश्रमशाळांसाठी शासनाने ठरवून दिलेल्या किमान सुविधा उपलब्ध आहेत का ? नसल्यास त्याची कारणे शोधून काढणे व कारणांची मिमांसा करणे·

3· आश्रमशाळांची आपल्या शाळेतील सुविधा वाढविण्यासाठी/सुधारण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांकडून किंवा शासनाकडून काही प्रयत्न केले आहेत का याचा आढावा घेणे·

4· आश्रमशाळेतील सोयी सुविधांमधे वाढ करण्यासाठी काही उपाय योजना सुचविणे·

### क्षेत्रीय पहणीसाठी नमुना निवड पध्दत -

2·3 वरीलप्रमाणे उद्दिष्टये साध्य करण्यासाठी राज्यातील एकूण 387 शासकिय आश्रमशाळांपैकी सह्याद्री व गोंडवन विभागातील निवडक 115 शासकिय आश्रमशाळांसंबंधी माहिती परीशिष्ट क्रमांक 1 च्या प्रपत्र क्रमांक 1 मध्ये गोळा करण्यात आली· जिल्हा निहाय माहिती तक्ता क्र 2·1 व 2·2 मध्ये दर्शविली आहे·

2.4 शासकिय आश्रमशाळांची निवड करताना खालील बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात आला.

1. सहयाद्री व गोंडवन या दोन विभागातील शासकिय आश्रमशाळा निवडण्यात आल्या, तसेच

2. आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील शासकिय आश्रमशाळा निवडण्यात आल्या.

3. ज्या ठिकाणी वाहतूकीच्या दृष्टीने बारमाही रस्ते, पिण्याच्या पाण्याची बारमाही सोय, वीज, बाजारपेठ, दवाखाना, सोसायटीचे कार्यालय, पिठाची गिरणी इ. सोयी उपलब्ध आहेत अशा भागातील शासकिय आश्रमशाळा निवडण्यात आल्या.

4. ज्या आश्रमशाळा भाडयाच्या इमारतीत सुरु आहेत अशा काही आश्रमशाळा निवडण्यात आल्या.

5. काही आश्रमशाळेच्या स्वतःच्या शासकिय इमारती आहेत व त्यासाठी जमिन संपादित करण्यात आल्या आहेत अशा आश्रशाळा निवडण्यात आल्या.

6. दुर्गम व डोंगराळ प्रदेशात आणि आदिम जमातीच्या व मागास क्षेत्रात उघडण्यात आलेल्या काही आश्रमशाळा निवडण्यात आल्या.

7. पेस्ट बेसिक आश्रमशाळा ज्या ठिकाणी आहेत अशा आश्रमशाळांचा अंतर्भाव देखील शासकिय आश्रमशाळा निवडताना करण्यात आला.

सर्वसाधारण रॅण्डम पध्दती प्रमाणे आदिवासी क्षेत्रातील जिल्हयांच्या प्रत्येक तालुक्यामधील एक आश्रमशाळेची क्षेत्रिय पहाणीसाठी निवड करण्यात आली आहे.

आवश्यक ती माहिती संकलनासाठी राज्यातील सहयाद्री तसेच गोंडवन विभागांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्र व बिगर आदिवासी उपयोजना क्षेत्र कार्यरत असलेल्या आश्रमशाळांची निवड केली त्याची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :-

तक्ता क्र.2.1

तक्ता क्र.2.1

**सह्याद्री विभाग -**

| अ.क्र. | जिल्हा | क्षेत्रनिहाय आश्रमशाळा टीएसपी | ओटीएसपी | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | नाशिक | 11 | 2 | 13 |
| 2. | ठाणे | 14 | | 14 |
| 3. | रायगड | _ | 4 | 4 |
| 4. | रत्नागिरी | _ | 1 | 1 |
| 5. | धुळे | 9 | 1 | 10 |
| 6. | पुणे | 2 | 3 | 5 |
| 7. | कोल्हापूर | _ | 2 | 2 |
| 8. | सातारा | _ | 1 | 1 |
| 9. | सोलापूर | _ | 2 | 2 |
| 10. | अहमदनगर | 1 | 2 | 3 |
| 11. | जळगांव | 2 | 6 | 8 |
| 12. | औरंगाबाद | _ | 1 | 1 |
| 13. | बीड | _ | 1 | 1 |
| | एकूण | 39 | 26 | 65 |

तक्ता क्र.2.2

**गोंडवन विभाग -**

| अनु.क्र. | जिल्हा | क्षेत्रनिहाय आश्रमशाळा | | |
|---|---|---|---|---|
| | | टीएसपी | ओटीएसपी | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | नागपूर | 1 | 4 | 5 |
| 2. | वर्धा | _ | 3 | 3 |
| 3. | अमरावती | 2 | 2 | 4 |
| 4. | अकोला | _ | 2 | 2 |
| 5. | बुलढाणा | _ | 3 | 3 |
| 6. | यवतमाळ | 7 | 4 | 11 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| 7. | नांदेड | 1 | 1 | 2 |
| 8. | परभणी | _ | 1 | 1 |
| 9. | भंडारा | 3 | 2 | 5 |
| 10. | गडचिरोली | 8 | _ | 8 |
| 11. | चंद्रपूर | 5 | 1 | 6 |
| | एकूण | 27 | 23 | 50 |
| सह्याद्री व गोंडवन विभागातील एकूण आश्रमशाळा | | 66 | 49 | 115 |

2.5 क्षेत्रिय पाहणीच्या संदर्भात आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन मुख्याध्यापकांकडून किंवा शिक्षकांकडून आश्रमशाळेमध्ये उपलब्ध असलेल्या सोयी व सुविधांच्या बाबतीत आढळणारी कमतरता, त्रुटी किंवा उपाया संबंधी त्यांचे अभिप्राय नोंदविण्याचे निश्चित करण्याचे ठरविण्यात आले तसेच सर्वेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळेतील किमान 2 मुली व 2 मुले यांचेकडून आश्रमशाळेतील उपलब्ध सुविधांबाबत माहिती घेण्याचे ठरविण्यात आले. विद्यार्थ्यांची निवड करताना प्राथमिक शाळेतील किमान एक व पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील किमान एक याप्रमाणे निवड करण्याचे निश्चित करण्यात आले.

2.6 **संदर्भ वर्ष** - क्षेत्रिय पाहणीसाठी संदर्भवर्ष 1989-90 असे ठरविण्यात आले असून काही बाबींवरील माहिती सन 1988 ते 1990 या कालावधीसाठी प्राप्त करण्याचेही ठरले.

2.7 **क्षेत्रिय पाहणीसाठी आवश्यक असणारी प्रपत्रे** -

शासकिय आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या सोयी व सुविधा संबंधी क्षेत्रिय पाहणीद्वारे माहिती गोळा करण्यासाठी दोन वेगवेगळी स्वतंत्र प्रपत्रे तयार करण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

प्रपत्र 1 :- शासकिय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक यांचेकडून माहिती गोळा करण्याच्या उद्देश्याने हे प्रपत्र तयार करण्यात आले. प्रचलित आश्रमशाळा व्यवस्थापनामध्ये कोणत्या सुधारणा अपेक्षित आहेत यावरील त्यांचे अभिप्राय घेण्यात आले.

प्रपत्र 2 :- आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकडून माहिती गोळा करण्याच्या हेतूने ही प्रश्नावली तयार करण्यात आली.

2.8 थोडक्यात असे म्हणता येईल की, क्षेत्रिय पाहणीअंतर्गत सह्याद्री विभागातील पुणे, नाशिक, अहमदनगर या जिल्ह्यातील तर गोंडवन विभागातील अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यातील आश्रमशाळांचा समावेश करण्यात आला. आणखी असे की, दुर्गम भागातील व अतिदुर्गम भागातील गावे तसेच प्राथमिक व पोस्ट बेसिक आश्रमशाळांची क्षेत्रिय पाहणीसाठी निवड करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातील कमीत कमी चार तालुके व प्रत्येक तालुक्यातील कमीत कमी एक आश्रमशाळा क्षेत्रिय पाहणीमध्ये अंतर्भूत करण्यात आली. क्षेत्रिय पाहणीचे काम मार्च-एप्रिल 1992 या कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आले.

=======

# प्रकरण ३ रे

## क्षेत्रिय पहणीतील माहिती संकलन व तिचे पृथःकरण -

3·1 क्षेत्रिय पहणीसाठी निवडलेल्या आश्रमशाळेतील सोयी सुविधांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यांमध्ये आश्रमशाळा नाहीत असे जिल्हे वगळता उर्वरित 25 जिल्ह्यांतील (सह्याद्री विभाग व गोंडवन विभागातील) 96 आश्रमशाळांतील मुख्याध्यापकांकडून प्रपत्रे भरून घेण्यात आली. यामध्ये सह्याद्री विभागातून 51 व गोंडवन विभागातून 45 आश्रमशाळांना प्रपत्रे भरून पाठविली.

3·2 सर्वेक्षणात गोळा केलेल्या माहितीच्या आधारे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी असणा-या भौतिक व शैक्षणिक सोयी सुविधांचा अभ्यास करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना मिळणा-या शैक्षणिक व भौतिक सुविधा तसेच त्यामधील अडचणी व कारणे यांचे पृथःकरण खालील तक्त्यांच्यामध्ये केले आहे.

3·3 क्षेत्रिय पहणीसाठी निवडलेल्या आश्रमशाळेतील सन 1990-91 मध्ये होस्टेलर व डेस्कॉलर विद्यार्थ्यांची एकूण संख्या खालील तक्त्यात विद्यार्थीसंख्या दर्शविल्याप्रमाणे :-

### तक्ता क्रमांक 3·1

### प्राथमिक व पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील वर्गनिहाय विद्यार्थी संख्या -

| वर्ग प्रकार | होस्टेलर | | डेस्कॉलर | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | विद्यार्थी संख्या |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| **सह्याद्री विभाग, शासकिय आश्रमशाळा (51) -** | | | | | | | |
| 1· **प्राथमिक** | | | | | | | |
| पहिला | 1172 | 656 | 158 | 119 | 1330 | 775 | 2105 |
| दुसरा | 1056 | 513 | 149 | 96 | 1205 | 609 | 1814 |
| तिसरा | 1092 | 522 | 100 | 83 | 1192 | 605 | 1797 |
| चौथा | 1134 | 449 | 110 | 65 | 1244 | 514 | 1758 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवा | 1185 | 463 | 141 | 94 | 1326 | 557 | 1883 |
| सहावा | 1104 | 363 | 83 | 60 | 1187 | 423 | 1610 |
| सातवा | 972 | 296 | 66 | 30 | 1038 | 326 | 1364 |
| एकूण §1§ | 7715 | 3262 | 807 | 547 | 8522 | 3809 | 12331 |

2. **पोस्ट बेसिक आश्रमशाळा -§19§**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आठवा | 514 | 91 | 84 | 30 | 598 | 121 | 719 |
| नववा | 474 | 73 | 47 | 24 | 521 | 97 | 618 |
| दहावा | 395 | 50 | 80 | 42 | 475 | 92 | 567 |
| एकूण §2§ | 1383 | 214 | 96 | 1594 | 310 | 1904 | |
| एकूण बेरीज §1 + 2§ | 9098 | 3476 | 1018 | 643 | 10116 | 4119 | 14235 |

## गोंडवन विभाग, शासकीय आश्रमशाळा §45§

1. **प्राथमिक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिला | 927 | 549 | 152 | 115 | 1079 | 664 | 1743 |
| दुसरी | 805 | 461 | 117 | 91 | 922 | 552 | 1474 |
| तिसरी | 870 | 532 | 125 | 84 | 995 | 616 | 1611 |
| चौथा | 805 | 509 | 89 | 77 | 894 | 586 | 1480 |
| पाचवा | 914 | 562 | 122 | 52 | 1036 | 614 | 1650 |
| सहावा | 843 | 421 | 102 | 37 | 945 | 458 | 1403 |
| सातवा | 815 | 328 | 99 | 52 | 914 | 380 | 1294 |
| एकूण §1§ | 5979 | 3362 | 806 | 508 | 6785 | 3870 | 10655 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2. पोस्ट बेसिक आश्रमशाळा §14§ - | | | | | | | |
| आठवी | 361 | 116 | 48 | 29 | 409 | 145 | 554 |
| नववी | 313 | 83 | 29 | 13 | 342 | 96 | 438 |
| दहावी | 213 | 58 | 30 | 10 | 243 | 68 | 311 |
| एकूण §2§ | 887 | 257 | 107 | 52 | 994 | 309 | 1303 |
| एकूण बेरीज §1 + 2§ | 6866 | 3619 | 883 | 560 | 7779 | 479 | 11958 |

3.4 माहिती पृथक्करण

1 उपरोक्त तक्त्यावरून निवडलेल्या जिल्ह्यातील आश्रमशाळेत सह्याद्री विभागामध्ये प्राथमिक व पोस्ट बेसिक आश्रमशाळेत मिळून 9098 मुले व 3476 मुली वसतिगृहात राहून शिक्षण घेतात. तर 1018 मुले व 643 मुली डेस्कॉलर म्हणून शिक्षण घेतात.

2. सह्याद्री विभागात होस्टेलवर व डेस्कॉलर मुलांची संख्या 10,116 तर मुलींची संख्या 4119 असे एकूण 14,235 विद्यार्थी सह्याद्री विभागातील 51 आश्रमशाळेत शिक्षण घेत असल्याचे आढळून आले.

3. गोंडवन विभागातील निवडलेल्या एकूण 45 आश्रमशाळेतील शासकीय प्राथमिक आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रमशाळा मिळून 6,866 मुले व 3,619 मुली वसतिगृहात राहून §होस्टेल§ शिक्षण घेतात. यामध्ये 5,979 मुले व 3,362 मुली इयत्ता 7 वी पर्यंत शिक्षण घेतात तर 887 मुले व 257 मुली इयत्ता 8 वी ते 10 वी पर्यंत शिक्षण घेत असल्याचे आकडेवारीवरून दिसून आले.

4. तसेच गोंडवन विभागामध्येच 883 मुले व 560 मुली डेस्कॉलर विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असल्याचे आढळून आले. प्राथमिक आश्रमशाळेत डेस्कॉलर विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आढळले तर पोस्ट बेसिक आश्रमशाळेत 159 विद्यार्थी डेस्कॉलर विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असल्याचे गोंडवन विभागात आढळून आले.

5. दोन्ही विभाग मिळून होस्टेलर व डेस्कॉलर विद्यार्थ्यांची संख्या 26,193 आढळली. यामध्ये 17,895 मुले व 8,298 मुली आश्रमशाळेत शिक्षण घेत असल्याचे आढळले.

सहयाद्री व गोंडवन विभागाची तुलना केली असता खालील बाबी आढळून आल्या.

6. सहयाद्री विभागात होस्टेलर मुलांची संख्या जास्त आढळून आली तर गोंडवन विभागात होस्टेलर मुलींची संख्या जास्त असल्याचे आढळून आले.

3.3 अध्यापकवर्ग : आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी असणारा मान्य अध्यापकवर्ग /सेवक वर्ग किती असहे यावरील खालील माहिती उपलब्ध झाली :-

**तक्ता क्रमांक 3.2**

**विभागवार आश्रमशाळांसाठी मान्य अध्यापकवर्ग -**

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदसंख्या | भरलेली पदे | रिक्त पदे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| | **सहयाद्री विभाग** | | | | |
| 1. | प्राथ. मुख्याध्यापक | 49 | 41 | 8 | 16 |
| 2. | माध्य. मुख्याध्यापक | 18 | 18 | - | - |
| 3. | अधिक्षक | 42 | 40 | 2 | 4.5 |
| 4. | उच्चश्रेणी प्राथ. शिक्षक | 35 | 27 | 8 | 23 |
| 5. | प्राथ.शिक्षक | 325 | 308 | 17 | 5 |
| 6. | माध्य. शिक्षक | 78 | 76 | 2 | 2.5 |
| 7. | बालवाडी शिक्षिका | 43 | 42 | 1 | 2 |
| एकूण | सहयाद्री विभाग | 590 | 552 | 38 | 6 |
| | **गोंडवन विभाग** | | | | |
| 1. | प्राथ.मुख्याध्यापक | 37 | 19 | 18 | 49 |
| 2. | माध्य. मुख्याध्यापक | 14 | 13 | 1 | 7 |
| 3. | अधिक्षक | 28 | 26 | 2 | 7 |
| 4. | उच्चश्रेणी प्राथ.शिक्षक | 22 | 21 | 1 | 4.5 |
| 5. | प्राथ. शिक्षक | 267 | 251 | 16 | 6 |
| 6. | माध्य. शिक्षक | 53 | 53 | - | - |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 7. | बालवाडी शिक्षक | 30 | 29 | 1 | 3 |
| एकूण गोंडवन विभाग | | 451 | 412 | 39 | 9 |
| | एकूण | 1041 | 964 | 77 | 7 |

3.4 माहितीचे विभागवार पृथःकरण -

I. सहयाद्री विभाग -

1. उपरोक्त तक्त्यावरून सहयाद्री विभागात 49 प्राथमिक मुख्याध्यापक मंजूर पदे व 18 माध्यमिक मुख्याध्यापकांची मंजूर पदे असल्याचे आढळून आले. त्यापैकी अनुक्रमे 41 व 18 पदे भरण्यात आल्याचे आढळले.

2. सहयाद्री विभागातील निवडलेल्या 51 आश्रमशाळांपैकी 42 शाळांमध्ये अधीक्षकांचे पद मंजूर असून 40 पदे भरलेली आहेत. उर्वरित 2 पदे रिक्त आढळली मात्र 9 आश्रमशाळांमध्ये अधीक्षकाचे पद मंजूर नसल्याचे आढळून आले.

3. सहयाद्री विभागात उच्च श्रेणी प्राथमिक शिक्षकांची 35 पदे मंजूर असून 27 (77 टक्के) पदे भरलेली आहेत व 8 पदे (23 टक्के) रिक्त आहेत. तर प्राथमिक शिक्षकांपैकी 17 पदे रिक्त आहेत.

II. गोंडवन विभाग -

4. गोंडवन विभागातील माहिती मागविलेल्या 45 शासकिय आश्रमशाळांचा अभ्यास केला असता उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की 37 प्राथमिक मुख्याध्यापकांची पदे मंजूर असून त्यातील 19 पदे भरलेली आहेत, तर 18 प्राथमिक मुख्याध्यापकांची पदे भरण्यात आलेली नाहीत.

5. गोंडवन विभागातील 45 आश्रमशाळांमध्ये 16 प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

6. सहयाद्री व गोंडवन विभागाचा तुलनात्मकदृष्टया अभ्यास करता असे दिसून येते की दोन्ही विभागात प्राथमिक शिक्षकांची अनुक्रमे 17 व 16 पदे रिक्त आहेत, तर दोन्ही विभागातील प्राथमिक

मुख्याध्यापकांची एकूण 26 पदे रिक्त असल्याचे आढळून आले.

7. सहयाद्री विभागात प्राथमिक मुख्याध्यापक, माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक यांचा एकूण 38 पदे रिक्त आहेत, तर गोंडवन विभागात 34 पदे रिक्त असल्याचे आढळून आले.

3.6 आश्रमशाळेतील इतर कर्मचारीवृंद -

सांख्यिकी माहिती तक्ता क्र.37 मध्ये दर्शविल्याप्रमाणे -

तक्ता क्र.3

आश्रमशाळेसाठी मान्य सेवक वर्ग - चतुर्थश्रेणी.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पदसंख्या. | भरलेली पदे | रिक्त पदे | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| I. सहयाद्री विभाग | | | | | |
| 1. | स्वयंपकी | 195 | 184 | 11 | 6 |
| 2. | कामाठी | 189 | 181 | 8 | 4 |
| 3. | चौकीदार | 34 | 33 | 1 | 3 |
| 4. | शिपाई | 15 | 15 | - | - |
| 5. | सफाई कामगार | 15 | 14 | 1 | 7 |
| 6. | दाई/प्र.परिचर | 26 | 23 | 3 | 12 |
| एकूण सहयाद्री विभाग | | 474 | 450 | 24 | 5 |
| II. गोंडवन विभाग - | | | | | |
| 1. | स्वयंपकी | 101 | 94 | 7 | 7 |
| 2. | कामाठी | 103 | 96 | 7 | 7 |
| 3. | चौकीदार | 22 | 22 | - | - |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 4. | शिपाई | 6 | 5 | 1 | 17 |
| 5. | सफाई कामगार | 2 | 1 | 1 | 50 |
| 6. | दाई/प्र.परिचर | 13 | 13 | - | - |
| एकूण गोंडवन विभाग | | 247 | 231 | 16 | 6 |
| | एकूण संख्या | 721 | 681 | 40 | 6 |

3.7 तक्त्यातील माहितीचे पृथःकरण -

I. सह्याद्री विभाग -

1. उपरोक्त तक्त्यावरून सह्याद्री विभागात स्वयंपाकी व कामाठीचा अनुक्रमे 195 व 189 पदे मंजूर असून त्यापैकी 184 व 181 पदे भरलेली असल्याचे आढळून आले, तर अनुक्रमे 11 व 7 पदे रिक्त आढळली.

2. सफाईगारच्या 15 पदांपैकी 14 भरलेली असून 1 पद रिक्त असल्याचे आढळून आले.

3. दाई /प्र.परिचर या पदाची 26 पदे मंजूर असून 23 पदे भरलेली आहेत व उर्वीरत 3 पदे रिक्त आढळली.

II. गोंडवन विभाग -

1. गोंडवन विभागातील स्वयंपाकीची एकूण 101 पदे असून त्यापैकी 94 पदे भरलेली आहेत व 7 पदे रिक्त आहेत व 7 पदे रिक्त आहेत. तसेच कामाठीची 103 मंजूर पदांपैकी 96 भरलेली आहेत व उर्वीरत 7 रिक्त असल्याचे आढळले.

2. शिपाई व सफाईगारची प्रत्येकी 1 पद रिक्त असल्याचे आढळून आले.

## आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य-पुरवठा-भोजन-निवास साहित्य-

3·8 आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कोणकोणते साहित्य पुरविले जाते याची माहिती पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे·

तक्ता क्र· 3·4

विद्यार्थ्यांना पुरविले जाणारे साहित्य

| अ·क्र· | साहित्य प्रकार व प्रमाण | सह्याद्री विभागातील शाळा· | गोंडवन विभागातील शाळा· | एकूण | टक्केवारी प्रमाणे पुरविलेले साहित्य· |
|---|---|---|---|---|---|
| 1· | 2· | 3· | 4· | 5· | 6· |
| 1· अ· | दरमहा साबण | | | | |
| | 1· अंघोळीसाठी | 51 | 44 | 95 | 99 |
| | 2· कपडे धुण्यासाठी | 51 | 44 | 95 | 99 |
| ब· | दरमहा तेल | 47 | 44 | 91 | 95 |
| क· | वर्षातून दोन युनिफॉर्मस् | | | | |
| | 1· 1988 | 47 | 39 | 86 | 90 |
| | 2· 1989 | 51 | 40 | 90 | 94 |
| | 3· 1990 | 51 | 4 | 91 | 95 |
| ड· | अंथरूण पांघरूण | 44 | 34 | 82 | 85 |
| इ· | पेटी | 47 | 34 | 81 | 84 |
| फ | ताट,वाटी,तांब्या | 49 | 34 | 83 | 86 |

(1) उपरोक्त तक्त्यातील माहितीवरून असे दिसते की, 99 टक्के आश्रमशाळांना अंघोळीसाठी व कपडे

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 3. | शाळेमध्ये खेळण्यासाठी असणा-या पुढील सोयी | | | | |
| | 1. डबलबार | 8 | 19 | 27 | 28 |
| | 2. सिंगलबार | 8 | 21 | 29 | 30 |
| | 3. बास्केटबॉल ग्राउंड | 5 | 5 | 10 | 10 |
| 4. | आश्रमशाळेतील व्यायाम शिक्षकांची पदे | 10 | 6 | 16 | 17 |

1. 23 टक्के आश्रमशाळेत क्रिकेट खेळण्यासाठी साहित्य ठेवल्याचे आढळून आले तर 49 टक्के आश्रमशाळांमध्ये फूटबॉल व 85 टक्के आश्रमशाळेत व्हॉलीबॉल उपलब्ध असल्याचे आढळून आले. या व्यतिरिक्त मुलांना व्यायामासाठी 28 टक्के आश्रमशाळांमध्ये डबलबार व 30 टक्के आश्रमशाळांमध्ये सिंगलबार सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले.

2. दोन्ही विभागांचा एकत्रित विचार करता असे दिसते की फक्त 10 टक्के आश्रमशाळांमध्ये बास्केटबॉल ग्राउंड उपलब्ध आहे. परंतु 5 टक्के आश्रमशाळांमध्ये बास्केटबॉल खेळला जात असल्याचे आढळून आले. उर्वरित 5 टक्के आश्रमशाळांमध्ये बास्केटबॉल खेळला जात नसल्याचे आढळले.

3. माहिती मागविलेल्या 96 आश्रमशाळांपैकी फक्त 17 टक्के आश्रमशाळेत व्यायाम शिक्षक असल्याचे आढळून आले. उर्वरित 83 टक्के आश्रमशाळेत व्यायाम शिक्षकाचे पद मंजूर नसल्याने व्यायाम शिक्षक नसल्याचे आढळले व विद्यार्थ्यांना "शारीरीक शिक्षण" हा विषय शिकविला जात नसल्याचे आढळून आले.

3.10 आश्रमशाळेतील अंतर्गत सोयी सुविधांविषयी माहिती जाणून घेतली असता खालील निष्कर्ष हाती आले. त्या संबंधीची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

पुण्यासाठी साबण पुरविण्यात येतो

(2) तसेच 95 टक्के आश्रमशाळेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींना तेल पुरविण्यात येते.

(3) 90 टक्के आश्रमशाळांना इ.सन 1988 मध्ये वर्षातून 2 युनिफॉर्मस्, 94 टक्के आश्रमशाळांना 1989 मध्ये 2 युनिफॉर्मस् तर 1990 मध्ये 95 टक्के आश्रमशाळांना युनिफॉर्मस् पुरविण्यात आले. विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे युनिफॉर्मस् 15 ऑगस्टपूर्वी किंवा शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यावर 1 युनिफॉर्म पुरविण्यात येतो तर दिवाळी नंतर किंवा 26 जानेवारीला दुसरा युनिफॉर्म पुरविण्यात येतो.

याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना कपडे पुरविण्यात येत नाहीत. माहिती मागविलेल्या एकूण 96 आश्रमशाळांपैकी 1990 मध्ये 82 आश्रमशाळांमध्ये अंथरुण पांघरुण पुरविण्यात येत असल्याचे आढळून आले. तसेच 81 आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना पेट्या (ट्रंक्स) तर 83 आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना ताट, वाटी, तांब्या पुरविण्यात येत असल्याचे आढळून आले.

## आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य पुरवठा -

3.9 विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी कोणकोणते खेळाचे साहित्य पुरविण्यात येते याचा अभ्यास केला असता खालील बाबी आढळून आल्या.

तक्ता क्र.3.[illegible]

विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेले खेळाचे साहित्य -

| अ.क्र. | साहित्य प्रकार | शाळांची विभागणी सह्याद्री विभाग | शाळांची विभागणी गोंडवन विभाग | एकूण | टक्केवारीप्रमाणे पुरविलेले साहित्य |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| 2. | विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे खेळाचे साहित्य | 41 | 39 | 80 | 83 |
| | 1. क्रिकेट | 10 | 11 | 21 | 23 |
| | 2. व्हॉलीबॉल | 46 | 36 | 82 | 85 |
| | 3. बास्केटबॉल | 2 | 3 | 5 | 5 |
| | 4. फुटबॉल | 21 | 26 | 47 | 49 |

### तक्ता क्र. 3.6
### शासकिय आश्रमशाळांची इमारत व अंतर्गत सोयी सुविधांविषयी माहिती -

| अ.क्र. | सोयी सुविधांचा तपशिल | आश्रमशाळां संख्या सहयाद्री विभाग | गोंडवन विभात | दोन्ही विभाग मिळून एकूण संख्या. |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| 1. | आश्रमशाळेची इमारत - केवळ शासकिय | 33 | 24 | 57 |
| | केवळ भाडयाची | 7 | 7 | 14 |
| | शासकिय/भाडयाची | 11 | 14 | 25 |
| | इमारतीचा प्रकार - कच्ची इमारत | 23 | 18 | 41 |
| | पक्की इमारत | 23 | 22 | 45 |
| | दोन्ही इमारती | 5 | 5 | 10 |
| 2. | एकूण खोल्यांची संख्या | 505 | 529 | 1034 |
| | इमारत शासकिय/भाडयाची दोन्ही | 11 | | |
| 3. | त्यातील पुढील बाबींसाठी खोल्या वापरल्या जातात. | | | |
| | अ. स्टोअर रुम | 35 | 32 | 67 |
| | ब. ऑफीस | 36 | 36 | 72 |
| | क. मुख्याध्यापकांचे निवासस्थान | 19 | 9 | 28 |
| | ड. शिक्षक कक्ष | 8 | 7 | 15 |
| | इ. जेवणासाठी स्वतंत्र हॉल | 19 | 20 | 39 |
| | फ. स्वयंपाक गृह | 40 | 40 | 80 |
| | ग. करमणूक गृह | 5 | 5 | 10 |
| | ह. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना निवासासाठी | 30 | 31 | 61 |
| | य. शाळेसाठी | 27 | 33 | 60 |
| | ज. मुलींसाठी स्वतंत्र राहण्यासाठी 31 | 32 | 63 | |
| | ल. कोठीघर | 45 | 36 | 81 |
| | व. प्रयोगशाळा | 14 | 10 | 24 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
|---|---|---|---|---|
| | ब. वाचनालय | 3 | 4 | 7 |
| | न. अभ्यासिका | 1 | 2 | 3 |
| | प. व्यायामशाळा | 1 | - | 1 |
| 4. | कर्मचा-यांसाठी निवास व्यवस्था | 23 | 12 | 35 |
| | खालील कर्मचा-यांसाठी - | | | |
| | वर्ग 3 | 145 | 103 | 248 |
| | वर्ग 4 | 107 | 39 | 146 |
| 5. | मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व स्नानगृहाची सोय | 18 | 18 | 36 |
| 6. | आश्रमशाळेतील मुलींसाठी स्त्री कर्मचारी | 40 | 27 | 67 |
| 7. | आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष कोणत्या सोयी उपलब्ध केल्या जातात. | - | - | - |

माहिती पृथ्थकरण -

1. निवडलेल्या आश्रमशाळांपैकी 57 आश्रमशाळांना (58 टक्के) शासकिय व 14 (15 टक्के) आश्रमशाळांना भाडयाची इमारत असल्याचे आढळून आले तर 25 (29 टक्के) आश्रमशाळांना भाडयाची व शासकिय अशा दोन्ही प्रकारच्या इमारती असल्याचे आढळून आले.

2. आश्रमशाळेच्या इमारतीचा प्रकार पाहिला असता 41 आश्रमशाळांना कच्ची इमारत व 55 आश्रमशाळांना पक्की इमारत असल्याचे आढळून आले. 10 आश्रमशाळांना कच्ची व पक्की अशा दोन्ही प्रकारच्या इमारती असल्याचे आढळून आले.

3· माहिती मागविलेल्या आश्रमशाळांमध्ये खोल्यांची संख्या पाहिली असता 1034 खोल्या उपलब्ध असल्याचे आढळून आले· पैकी 505 सह्याद्री विभागात 529 गोंडवन विभागात असल्याचे आढळून आले· वरील खोल्या शासकिय तसेच भाडयाच्या असल्याचे आढळून आले·

4· वरील खोल्या पुढील बाबींसाठी वापरल्या जात असल्याचे आढळून आले· दोन्ही विभागात मिळून 67 खोल्या स्टेअररूमसाठी, 72 खोल्या ऑफिससाठी तर 28 खोल्या आश्रमशाळांमध्ये मुख्याध्यापकांसाठी निवासस्थान म्हणून वापर होत असल्याचे आढळून आले·

5· याव्यतिरिक्त 15 खोल्यांमध्ये शिक्षक कक्ष तर 39 आश्रमशाळांमध्ये जेवणासाठी स्वतंत्र हॉल असल्याचे आढळून आले· 80 आश्रमशाळांसाठी स्वयंपाकासाठी स्वतंत्र स्वयंपाकगृह उपलब्ध असल्याचे आढळून आले·

6· फक्त 10 आश्रमशाळांमध्ये स्वतंत्र करमणूकगृह उपलब्ध असल्याचे आढळून आले·

7· विद्यार्थ्यांना निवासासाठी 61 स्वतंत्र निवासिका उपलब्ध असल्याचे आढळून आले तर शाळेसाठी 60 खोल्या उपलब्ध असल्याचे आढळून आले· यामध्ये शाळा व विद्यार्थी निवास एकच असल्याचे आढळून आले·

8· 91 आश्रमशाळांमधून सर्वसाधारणपणे एका आश्रमशाळेस 1 याप्रमाणे 63 खोल्यांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र राहण्याची सोय उपलब्ध करण्यात आलेली आहे·

9· 81 आश्रमशाळांमध्ये अन्नधान्य साठविण्यासाठी स्वतंत्र कोठीगृह तर 24 आश्रमशाळांना स्वतंत्र प्रयोगशाळा व फक्त 7 आश्रमशाळांना स्वतंत्र वाचनालयगृह तर 3 आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध असल्याचे आढळून आले·

10· विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार केला असता 95 (99 टक्के) आश्रमशाळांना व्यायामशाळा उपलब्ध नाहीत· पहाणीमध्ये फक्त एका आश्रमशाळेत व्यायामशाळा उपलब्ध असल्याचे आढळून आले·

11· पहाणीमध्ये 96 आश्रमशाळांमधील 749 तृतियश्रेणीतील कर्मचाऱ्यांना (प्राथमिक शाळेतील शिक्षक, माध्यमिक शिक्षक, बालवाडी शिक्षिका, अधिक्षक इ·) यांना निवासिका उपलब्ध असल्याचे आढळून आले· उर्वरित शिक्षक व कर्मचारी भाडयाचे जागेत किंवा सोयीच्या ठिकाणी किंवा परगावाहून जाऊन येऊन करीत असल्याचे आढळून आले·

12· सर्वेक्षण शाळांपैकी 36 आश्रमशाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व स्नानगृह उपलब्ध असल्याचे आढळून आले· परंतु पाण्याअभावी व इतर अडचणींमुळे बहुसंख्य आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या स्वच्छतागृह व स्नानगृहाचाही वापर करता येत नाही असे आढळून आले·

13. पहणामध्ये असे आढळून आले की मुलींसाठी स्वतंत्र स्त्री कर्मचा-याची नेमणूक केली जात नसल्याचे आढळून आले. मात्र 67 आश्रमशाळांमध्ये बालवाडी शिक्षिका रात्रपाळीसाठी मुलींची देखभाल करत असल्याचे आढळून आले. याव्यतिरिक्त मुलींसाठी अन्य विशेष सोयी उपलब्ध केल्या जात नसल्याचे आढळून आले.

3.11 शैक्षणिक/सांस्कृतिक सोयी/सुविधा -

आश्रमशाळेमध्ये असणा-या शैक्षणिक , सांस्कृतिक सोयी सुविधांचा अभ्यास केला असता त्याची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आढळली -

**तक्ता क्र.3.7**

**आश्रमशाळेतील शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी साधने याबाबत सुविधा व सोयी -**

| अ.क्र. | सुविधांचा प्रकार (शैक्षणिक) | सह्याद्री विभाग. | गोंडवन विभाग | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| 1. | पुढील बाबी असलेल्या आश्रमशाळा - | | | | |
| | 1. क्रिडांगण | 30 | 31 | 61 | 63 |
| | 2. टी.व्ही. | 14 | 8 | 22 | 21 |
| | 3. रेडिओ | 15 | 9 | 24 | 25 |
| | 4. प्र.उपचाराची सोय | 41 | 31 | 72 | 76 |
| 2. | आश्रमशाळेत खालील कार्यक्रम आयोजन - | | | | |
| | अ. एन.सी.सी. | - | - | - | - |
| | ब. स्काउट गाईड | 8 | 7 | 15 | 16 |
| | क. बॅन्ड पथक | 5 | 4 | 9 | 9 |
| | ड. हस्तकला | 5 | 2 | 7 | 7 |
| | इ. वीरबाला व बालवीर | 1 | 3 | 4 | 4 |
| | फ. व्यावसायिक प्रशिक्षण | - | - | - | - |
| | प. राष्ट्रीय भावना जागृती कार्यक्रम | 32 | 33 | 65 | 68 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 3. | ग्रंथालयातील एकूण पुस्तकांची संख्या - | | | | |
| | 1. मासिके | 1361 | 747 | 2108 | - |
| | 2. वर्तमानपत्रे | 32 | 33 | 65 | - |
| | 3. गोष्टींची पुस्तके | 17492 | 15368 | 32860 | - |

आश्रमशाळेतील शैक्षणिक सोयी सुविधाविषयक माहिती पृथःकरण -

1. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व्यायामासाठी खेळाचे साहित्य व क्रिडांगण यांचे शिक्षणात महत्व जास्त आहे. असे असूनही पहाणीमध्ये 96 आश्रमशाळांपैकी फक्त 61 आश्रमशाळांना (63 टक्के) क्रिडांगण असल्याचे आढळून आले.

2. शिक्षणात दृकश्राव्य माध्यमाचा प्रभावी अध्यापनासाठी उपयोग होतो असे असूनही पहाणीमध्ये फक्त 21 टक्के आश्रमशाळांमध्ये दूरदर्शन संच व 25 टक्के आश्रमशाळांमध्ये रेडिओ ही दृकश्राव्य साधने/माध्यमे आढळून आली. विज्ञानयुगामध्ये रेडिओ व दूरदर्शन यांचेमार्फत विद्यार्थ्यांना विविध प्रकारची माहिती पोहोचविली जात असल्याने वरील दृकश्राव्य माध्यमे सर्व आश्रमशाळांमध्ये असावयास हवी.

3. विद्यार्थ्यांचे निरोगी आरोग्य ही दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्वाची गरज आहे. त्यासाठी प्राथमिक उपचार व्यवस्था हवी परंतु पहाणीमध्ये 76 टक्के आश्रमशाळांमध्येच प्राथमिक उपचाराची सोय असल्याचे आढळून आले.

4. आश्रमशाळेत शैक्षणिक व अध्यापनाव्यतिरिक्त कोणकोणते विविध उपक्रम राबविले जातात हे पाहिले असता 16 टक्के आश्रमशाळांमध्ये स्काऊट गाईड, 9 टक्के आश्रमशाळांमध्ये बॅन्डपथक, 7 टक्के आश्रमशाळांमध्ये हस्तकला, 4 टक्के आश्रमशाळांमध्ये वीरबाला व बालवीर पथक, तसेच 68 टक्के आश्रमशाळांमध्ये राष्ट्रीय भावना जागृती कार्यक्रम राबविले जात असल्याचे आढळून आले. व्यवसाय प्रशिक्षण व एन.सी.सी.हे दोन उपक्रम कोणत्याही आश्रमशाळेत राबविले जात नसल्याचे आढळून आले.

वरील उपक्रमांची टक्केवारी पाहिली असता शैक्षणिक अभ्यासक्रमातिरिक्त राबविण्यात येणारे उपक्रम फारच थोड्या आश्रमशाळांमध्ये राबविले जात असल्याचे आढळून आले.

5. शासनाने सर्व आश्रमशाळांना ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. ग्रंथालयामध्ये कोणकोणती पुस्तके, साहित्य ठेवले आहे हे पहिले असता पहाणीमध्ये 96 आश्रमशाळेत 2108 मासिके, 65 वर्तमानपत्रे व 3286 गोष्टींची पुस्तके उपलब्ध असल्याचे आढळून आले.

3.12 भौतिक सोयी/सुविधा -

आश्रमशाळेतील भौतिक सोयी व सुविधांची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे -

तक्ता क्र 3.8

आश्रमशाळेतील भौतिक सुविधा व सोयी -

| अ.क्र. | सुविधांची प्रकार (भौतिक) | शाळांची वर्गवारी सह्याद्री विभाग. | गोंडवन विभाग. | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| 1. | पिण्याच्या पाण्याचा नियमित व पुरेसा पुरवठा होणा-या आश्रमशाळा - | 26 | 35 | 61 | 64 |
| 2. | पाणी पुरवठा साधन प्रकार संख्या - | | | | |
| | 1. नळ | 12 | 8 | 20 | 21 |
| | 2. विहिर | 22 | 22 | 44 | 46 |
| | 3. नलिका विहिर | 19 | 20 | 39 | 41 |
| | 4. इतर | 7 | 6 | 13 | 14 |
| 3. | अ. विजेची सोय असणा-या आश्रमशाळा | 45 | 33 | 78 | 80 |
| | ब. विजेची सोय नसण्याची कारणे - | | | | |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | गावाचे विद्युतिकरण झालेले नाही | 2 | 3 | 5 | 5 |
| 2. | विद्युतिकरण झालेले आहे परंतु विद्युत मंडळाकडून कनेक्शन मिळालेले नाही. | 3 | 7 | 10 | 10 |
| 3. | वीज पुरवठा चालू आहे परंतु आश्रमशाळेच्या इमारतीचे इलेक्ट्रीक फिटींगचे काम अपूर्ण आहे. | 3 | 3 | 5 | 5 |
| | क. विद्युत प्रस्तावावर करण्यात आलेली कार्यवाही- | | | | |
| 1. | विद्युत मंडळाकडे अर्ज पाठविला आहे | 3 | 7 | 10 | 10 |
| 2. | डिमांड नोट मिळाली पण रक्कम अदा करावयाची आहे. | - | 1 | 1 | 1 |
| 3. | प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी व निधी उपलब्धतेसाठी पाठविला आहे | 4 | 3 | 7 | 7 |
| 4. | बारमाही शाळेपर्यंतचा रस्ता | | | | |
| | असणा-या आश्रमशाळा | 34 | 31 | 65 | 68 |
| 5. | स्वयंपकासाठी इंधन - | | | | |
| | 1. एल.पी.जी.गॅस | - | - | - | - |
| | 2. बायोगॅस | - | - | - | - |
| | 3. सरपण, लाकडे | 51 | 45 | 96 | 100 |
| | 4. इतर | - | - | - | - |
| 6. | आश्रमशाळेमध्ये पुरविल्या जाणा-या वस्तू - | | | | |
| | 1. टेबल | 50 | 42 | 92 | 96 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| | 2. खुर्च्या | 50 | 42 | 92 | 96 |
| | 3. पंखे | 44 | 37 | 81 | 84 |
| | 4. घड्याळ | 26 | 29 | 55 | 57 |
| | 5. रॅक्स/कपाटे | 47 | 37 | 84 | 87 |
| | 6. कपांउन्ड | 13 | 13 | 26 | 27 |
| 7. | विद्यार्थ्यांसाठी पुरविल्या जाणा-या वस्तू - | | | | |
| | 1. गादी, उशी, कॉट | - | - | - | - |
| | 2. बूट, सॉक्स, चपला | - | 1 | 1 | 1 |
| | 3. स्कूल बॅग | 8 | 2 | 10 | 11 |
| | 4. कुलूप | 21 | 4 | 25 | 22 |
| 8. | 5 वी ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बेंचेस पुरविले जात असलेल्या आश्रमशाळा. | 8 | 8 | 16 | 17 |
| 9. | कोठीतील धान्य चांगले व सुरक्षित राहण्यासाठी जंतूनाशके व औषधे पुरविलेल्या आश्रमशाळा. 6 | 15 | 21 | 21 | |
| 10. | मुख्याध्यापकांना आर्थिक स्वयंपूर्णता | | | | |
| | अ. असणा-या आश्रमशाळा | 20 | 16 | 36 | 38 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| | ब. आर्थिक स्वातंत्र्याअभावी | | | | |
| | येणा-या अडचणी खालीलप्रमाणे - | | | | |
| | 1. औषधोपचारासाठी | 27 | 28 | 55 | 57 |
| | 2. वस्तू खरेदीसाठी | 24 | 23 | 47 | 49 |
| | 3. खर्चासाठी पूर्व मंजूरीची आवश्यकता | 4 | 3 | 7 | 7 |
| | 4. आकस्मिक खर्च | 23 | 20 | 43 | 45 |

पहाणीमध्ये आश्रमशाळांना अत्यावश्यक भौतिक सोयी सुविधांचा अभ्यास केला असता खालील बाबी निदर्शनास आल्या -

1. आश्रमशाळांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होतो का ? हे जाणून घेतले असता 64 टक्के आश्रमशाळांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत असल्याचे आश्रमशाळांनी कळविले आहे.

2. उपरोक्त तक्त्यावरुन 80 टक्के आश्रमशाळांना वीजेची सोय असल्याचे आढळून आले. उर्वरित 20 टक्के आश्रमशाळांना वीजेची सोय नसल्याची कारणे जाणून घेतली असता 5 टक्के आश्रमशाळांच्या गावाचे ठिकाणी विद्युतिकरण झाले नसल्याचे आढळून आले, 10 टक्के आश्रमशाळेचे ठिकाणी वायरिंगचे काम झालेले आहे परंतु महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून कनेक्शन मिळाले नसल्याचे आढळून आले. तर 5 टक्के आश्रमशाळेचे ठिकाणी इलेक्ट्रीक फिटींगचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे आढळून आले. ज्या आश्रमशाळांना अद्याप वीज पुरवठा नाही किंवा विद्युत पुरवठा मिळविण्यासाठी कार्यवाही चालू आहे याची माहिती जाणून घेतली असता 10 टक्के आश्रमशाळांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे विद्युत प्रस्तावासाठी अर्ज पाठविला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची रक्कम अदा करावयाची आहे व विद्युत पुरवठा संबंधीचा प्रस्ताव प्रशासकिय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी पाठविला असल्याचे आढळून आले.

3. आश्रमशाळांना दळणवळण सुविधा - रस्ते

आश्रमशाळेपर्यंत बारमाही रस्त्यांची सोय 68 टक्के आश्रमशाळांना उपलब्ध असल्याचे आढळून आले. उर्वरित 32 टक्के आश्रमशाळांना पावसाळयामध्ये वाहतूक व्यवस्था बंद पडल्याने दळणवळणाची गैरसोय निर्माण होते.

4. पहणीमध्ये 100 टक्के आश्रमशाळांमध्ये स्वयंपकासाठी (सरपण) लाकडे यांचा वापर केला जात असल्याचे आढळून आले.

5. उपरोक्त तक्त्यावरून पहणीमध्ये 96 टक्के आश्रमशाळांमध्ये टेबल, 96 टक्के आश्रमशाळांमध्ये खुर्च्या, 84 टक्के आश्रमशाळांमध्ये पंख, 57 टक्के आश्रमशाळांमध्ये घड्याळ, 87 टक्के आश्रमशाळांमध्ये ड्रेस व कपडे, तर 27 टक्के आश्रमशाळांना कपांऊड या वस्तू पुरविल्या जात असल्याचे आढळून आले.

6. दैनंदिन वापरासाठी फक्त एका आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांना चपला पुरविल्या गेल्याचे तर 11 टक्के आश्रमशाळांमध्ये स्कूलबॅग व 22 टक्के विद्यार्थ्यांना पेटीला लावण्यासाठी कुलूपे पुरविली जात असल्याचे आढळून आले.

7. पहणीमध्ये 16 पेस्ट बेसिक वर्गांना विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस पुरविली जात असल्याचे आढळून आले.

8. कोठातील धान्य चांगले व सुरक्षित राखण्यासाठी 21 टक्के आश्रमशाळांना जंतूनाशके व औषधे पुरविली जातात.

9. मुख्याध्यापकांना अडीअडचणींच्या वेळी आर्थिक स्वयंपूर्णता आहे का ? हे जाणून घेतले असता (त्यासाठी रु.200/-, रु.500/- व रु.1,000/- पर्यंत रक्कम) 38 टक्के आश्रमशाळांमधील मुख्याध्यापकांना आर्थिक स्वयंपूर्णता असल्याचे आढळून आले. उर्वरित 62 टक्के आश्रमशाळांना आर्थिक स्वयंपूर्णता उपलब्ध नसल्याचे आढळून येते. आर्थिक स्वयंपूर्णता औषधोपचार, वस्तू खरेदी, आकस्मिक खर्च इत्यादी कारणांसाठी उपलब्ध असल्याचे मुख्याध्यापकांकडून समजले.

3.13 सर्वेक्षणामध्ये आश्रमशाळा परिसरातील मूलभूत सोयींचा अभ्यास केला असता खालील बाबी आढळून आल्या.

तक्ता क्र.3.9

## शासकीय आश्रमशाळा परिसरातील मूलभूत सोयी/सुविधा उपलब्धता

| अ.क्र. | सुविधांचा प्रकार | शाळांची विभागणी §सुविधेनुसार§ §अंतर किलोमीटरमध्ये§ | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 ते 5 | 5 ते 10 | 10 ते 15 | 15 ते 20 | 20 चे पुढे | एकूण |
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. |
| 1. | बस सुविधा | 64 §67§ | - | - | - | 32 §33§ | 96 §100§ |
| 2. | पोलीस स्टेशन | 12 §12§ | 24 §25§ | 16 §17§ | 17 §18§ | 27 §28§ | 96 §100§ |
| 3. | टेलिग्राम | 14 §14§ | 23 §24§ | 13 §14§ | 13 §14§ | 33 §34§ | 96 §100§ |
| 4. | बाजारपेठ | 19 §20§ | 24 §25§ | 13 §14§ | 13 §14§ | 27 §27§ | 96 §100§ |
| 5. | पिठाची गिरणी | 75 §78§ | 8 §8§ | 2 §2§ | 4 §4§ | 7 §8§ | 96 §100§ |
| 6. | पोस्ट ऑफिस | 64 §67§ | 15 §16§ | 6 §6§ | 6 §6§ | 5 §5§ | 96 §100§ |
| 7. | रेल्वे स्टेशन | 11 §12§ | 7 §7§ | 7 §7§ | 8 §8§ | 63 §63§ | 96 §100§ |
| 8. | जवळची बँक | 30 §32§ | 24 §25§ | 12 §12§ | 6 §6§ | 24 §24§ | 96 §100§ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9. | प्रथ.आरोग्यकेंद्र | 36 §37§ | 29 §30§ | 13 §14§ | 5 §5§ | 13 §14§ | 96 §100§ |
| 10. | जोड रस्ता | 60 §63§ | 8 §8§ | 6 §6§ | 5 §5§ | 17 §18§ | 96 §100§ |

§कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात§

**शासकीय आश्रमशाळापरिसरातील मुलभूत सोयी/सुविधा माहिती पृथःकरण -**

**सार्वजनिक सुविधा : दळणवळण -**

बस व्यवस्था : सोय

1. उपरोक्त तक्त्यातील माहितीवरुन असे दिसते की, 67 टक्के आश्रमशाळांना 1 ते 5 कि.मी.च्या आत बसव्यवस्था उपलब्ध असल्याचे आढळून आले तर 33 टक्के आश्रमशाळांना 20 कि.मी.च्या पुढे बस व्यवस्था उपलब्ध असल्याचे आढळून आले.

2. 34 टक्के आश्रमशाळांना टेलिग्राम व्यवस्था 20 कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर आहे. तर उर्वरित आश्रमशाळांना 20 कि.मी.पर्यंत टेलिग्रामची सोय आहे.

3. 27 टक्के आश्रमशाळांना बाजारपेठ 20 कि.मी.च्या पुढे आहे तर 63 टक्के आश्रमशाळांना 20 कि.मी.पर्यंत बाजारपेठेची सोय उपलब्ध आहे.

4. 78 टक्के आश्रमशाळांना 1 ते 5 कि.मी.अंतरापर्यंत पिठाच्या गिरणीची सोय आहे. उर्वरित 22 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी.च्या पुढे सदर सोय उपलब्ध असल्याचे आढळून आले.

5. 67 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी.अंतरापर्यंत पोस्ट ऑफिसची सोय उपलब्ध आहे. तर 43 टक्के आश्रमशाळांना ही सोय 5 कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर उपलब्ध असल्याचे आढळून आले.

6. आश्रमशाळांना बँक व्यवस्थेची सुविधा 1 ते 5 कि.मी.अंतरापर्यंत फक्त 32 टक्के आश्रमशाळांना आढळून आली. उर्वरित 68 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर बँक सुविधा असल्याचे

आढळून आले.

सार्वजनिक आरोग्य सेवा-सुविधा -

7. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमशाळांपासून किती अंतरवर आहे याचा अभ्यास केला असता फक्त 37 टक्के आश्रमशाळांना ही सोय 5 कि.मी.च्या आत असल्याचे आढळून आले. उर्वरित 63 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी.च्या पुढे प्राथमिक आरोग्य केंद्राची सोय उपलब्ध असल्याचे आढळून आले.

8. आश्रमशाळा ज्या गावात आहेत त्या गावापर्यंत येण्यासाठी जोडरस्त्यांची सोय आहे का ? हे पाहिले असता 63 टक्के आश्रमशाळांना 1 ते 5 कि.मी.लांबीच्या जोडरस्त्यांची सोय आहे. 18 टक्के आश्रमशाळांना 20 कि.मी.च्या पुढे जोड रस्त्यांची सुविधा आहे तर उर्वरित 19 टक्के आश्रमशाळांना 5 ते 20 कि.मी लांबीचे जोड रस्त्यांची सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले.

शारीरिक आरोग्य संवर्धन सोयी-सुविधा स्थिती -

3.14 शासकीय आश्रमशाळा परिसरातील असणा-या मुलभूत सोयी सुविधांचा अभ्यास केल्यानंतर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने वैद्यकीय सोयी/सुविधा आढळून आलेल्या बाबी

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत :-

**तक्ता क्र. 3.10**

**आश्रमशाळेमध्ये असणा-या वैद्यकिय सोयी सुविधा -**

| अ.क्र. | वैद्यकिय सुविधा प्रकार | शाळांची विभागणी सह्याद्री विभाग | गोंडवन विभाग | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| 1. | आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी वर्षातून किती वेळा? | 44 | 44 | 88 | 92 |
| | 1. 1 वेळा | 16 | 13 | 29 | 30 |
| | 2. 2 वेळा | 21 | 17 | 38 | 40 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| | 3. 3 वेळा | 10 | 12 | 22 | 23 |
| | 4. अनेक वेळा | 3 | 2 | 5 | 5 |
| 2. | सेवा देणा-या वैद्यकिय अधिका-याचा हुद्दा - | | | | |
| 1. | वैद्यकिय अधिकारी | 45 | 42 | 87 | 91 |
| 2. | आरोग्य रक्षक/सहायक | 7 | 12 | 19 | 20 |
| 3. | कुष्ठरोग पर्यवेक्षक अधिकारी | 10 | 11 | 21 | 22 |
| 4. | आरोग्य अधिकारी | 6 | 6 | 12 | 12 |
| 5. | नर्स/परिचारिका | 4 | 4 | 8 | 8 |
| 6. | ॲ.हे.पी.एस | 2 | 9 | 11 | 11 |
| 7. | इतर मलेरिया डॉक्टर | 11 | 4 | 15 | 16 |
| 3. | 1990 मध्ये विद्यार्थ्यांची केलेली वैद्यकिय तपासणी - | | | | |
| | विद्यार्थ्यांची संख्या | 10,558 | 9,712 | 20,270 | |
| 4. | आश्रमशाळेत उपलब्ध असणारी औषधे - (आजारनिहाय) | | | | |
| 1) | सर्दी,पडसे व डोके दुखीसाठी | 17 | 9 | 26 | 27 |
| 2) | थंडी,ताप, खोकला यासाठी | 21 | 16 | 37 | 38 |
| 3) | डोळ्याचे विकार | 17 | 17 | 34 | 35 |
| 4) | त्वचा रोग/सरूज इत्यादी | 20 | 22 | 42 | 43 |
| 5) | जुलाब व पेट दुखी | 20 | 18 | 38 | 39 |
| 6) | अयोडिन/जखम पवडर | 32 | 31 | 63 | 65 |
| 7) | जखमेवरील पट्टी/बँडेज | 20 | 11 | 31 | 32 |
| 8) | हाफकीन इन्स्टट्यूटची औषधे | 7 | 1 | 8 | 8 |
| 9) | दाताचे विकार/अशक्तपणा | 7 | 10 | 17 | 17 |
| 10) | प्रथमोपचार पेटी | 5 | 1 | 6 | 6 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 5. | अचानक उद्भवलेल्या आजारपणामुळे आश्रमशाळेला प्राथमिक आरोग्य केंद्राशी साधावा लागलेला §1990§ संपर्क | | | | |
| 1. | एक वेळा | 6 | 3 | 9 | 9 |
| 2. | दोन वेळा | 8 | 12 | 20 | 20 |
| 3. | तीन वेळा | 16 | 13 | 29 | 30 |
| 4. | तीन पेक्षा अधिक | 12 | 9 | 21 | 21 |
| 5. | एकदाही नाही | 9 | 8 | 17 | 17 |
| 6. | शासकिय वैद्यकिय मदत उपलब्ध न झाल्यास गावातील व्यक्तींकडून वैद्यकिय उपचार करवून घेण्यात येतात. | | खाजगी डॉक्टरकडे नेले जाते. | | |
| 7. | मागील एक वर्षात अशा प्रकारे शासकिय वैद्यकिय सेवा उपलब्ध न झाल्यास इतर वैद्यकिय व्यावसायिका--कडून किती वेळा वैद्यकिय उपचार करून घ्यावे लागतात. | | | | |
| 1. | एक वेळा | 4 | 5 | 1 | 9 |
| 2. | दोन वेळा | 7 | 5 | 12 | 12 |
| 3. | तीन वेळा | 8 | 8 | 16 | 16 |
| 4. | तीनपेक्षा जास्त | 8 | 8 | 16 | 16 |
| 5. | एकदाही नाही | 20 | 19 | 39 | 41 |
| 9. | शासकिय वैद्यकिय सेवा उपलब्ध न होण्याची सर्वसाधारण कारणे - | | | | |
| 1§ | वैद्यकिय अधिकारी उपलब्ध नसतात. | 8 | 9 | 17 | 17 |
| 2§ | औषधे संपलेली असतात | 7 | 9 | 16 | 16 |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|
| 3) | वाहन वेळेवर उपलब्ध होत नाही | 16 | 14 | 30 | 31 |
| 4) | एस.टी.बस सेवा वाहतुक बंद | 15 | 8 | 23 | 23 |
| 5) | पावसाळयात वाहतुक बंद | 7 | 1 | 8 | 8 |
| 6) | कच्चा रस्ता यामुळे पायी प्रवास | 5 | 5 | 10 | 10 |
| 7) | सुट्टीचे दिवशी दवाखाना बंद | 7 | 2 | 9 | 9 |
| 8) | प्राथ.आरोग्य केंद्र लांब अंतरावर असल्याने | - | 15 | 15 | 15 |

**सांख्यिकी माहिती विश्लेषण :**

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आश्रमशाळांमध्ये काय काय सुविधा उपलब्ध आहेत हे पाहिले असता खालील बाबी आढळून आल्या :-

(1) विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी -

उपलब्ध माहितीनुसार 93 टक्के आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी झाल्याचे आढळून आले. यामुळे त्यामध्ये 30 टक्के आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची एकदा, 40 टक्के आश्रमशाळांचा 2 वेळा, तर 23 टक्के आश्रमशाळांनी वर्षातून 3 वेळा शारीरिक तपासणी झाल्याचे आढळून आले. 1990 साली सहयाद्री व गोंडवन विभाग मिळून 20,270 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आल्याचे आढळून आले. आरोग्य तपासणी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सहयाद्री विभागातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती.

(2) वैद्यकिय अधिका-यांच्या भेटी -

विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करणा-यांमध्ये तसेच आश्रमशाळेला वैद्यकिय कारणास्तव भेटी देणा-या अधिका-यांमध्ये 92 टक्के अधिकारी वैद्यकिय अधिकारी असल्याचे आढळून आले. उर्वरित अधिका-यांपैकी कुष्ठरोग पर्यवेक्षक अधिकारी, नर्स (परिचारिका), मलेरिया डॉक्टर व आरोग्याधिकारी यांनी भेटी दिल्याचे आढळून आले.

(3) प्रथमोपचार व्यवस्था - सोय -( औषधसाठा स्थिती) -

आश्रमशाळेतील विद्यार्थी आजारी पडला किंवा विद्यार्थ्यांस अचानक किरकोळ आजारपण आले तर त्यावर त्वरीत इलाज करण्यासाठी आश्रमशाळांमध्ये काय उपाययोजना केली जाते हे पाहिले असता 27 टक्के आश्रमशाळांमध्ये सर्दी, पडसे, डोकेदुखी यासारख्या किरकोळ आजारांवर गोळ्या, औषधे यांचा साठा असल्याने विद्यार्थ्यांवर त्वरीत इलाज केला जातो. थंडी, ताप, खोकला इ.आजारांवर 39 टक्के आश्रमशाळांमध्ये औषधांचा साठा उपलब्ध आहे. डोळ्याचे विकारांवर 36 टक्के आश्रमशाळांमध्ये औषधांची सोय केलेली आहे.

(4) नियमित स्नान व्यवस्थेच्या अभावामुळे बहुसंख्य आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना त्वचारोग असल्याचे आढळून आले.

(5) रोगाच्या साथीमुळे, तसेच पावसाळ्यातील अशुध्द पाणी पुरवठ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जुलाब तसेच पोटदुखीसारखे विकार होत असल्याचे आढळून आले. त्यावर उपाययोजना करण्यासाठी 40 टक्के आश्रमशाळांमध्ये औषधे उपलब्ध असल्याचे आढळून आले.

(6) विद्यार्थ्यांना खेळताना लागणे, झाडावरुन पडणे, ठेच लागणे क्वचित प्रसंगी मारामारी इ. कारणांमुळे विद्यार्थ्यांना जखमा होतात यासाठी 66 टक्के आश्रमशाळांमध्ये औषधोपचारांची सोय उपलब्ध केली असल्याचे आढळून आले. त्यामध्ये जखमेवरील पट्टी, मलम, बँडेज इत्यादी बाबींचा समावेश असतो.

8 टक्के आश्रमशाळांना हाफकिन इन्स्टिट्यूटमार्फत औषधे उपलब्ध झाल्याचे आढळून आले. दातांचे विकार व विद्यार्थ्यांना येणारा अशक्तपणा घालविण्यासाठी 18 आश्रमशाळांमधून औषधांची योजना केली जाते.

(7) प्रथमोपचार पेटी - सोय :

प्रथमोपचार पेटीची व्यवस्था किती आश्रमशाळांमधून आहे हे पाहिले असता फक्त 6 टक्के आश्रमशाळांमध्ये प्रथमोपचार पेटी (फस्ट एड बॉक्स) उपलब्ध असल्याचे आढळून आले. उर्वरित आश्रमशाळामध्ये प्रथमोपचार पेटी ठेवत नसल्याचे आढळून आले.

(8) प्राथमिक आरोग्य केंद्र संपर्क -

विद्यार्थ्यांना अचानक आजारपण जाणवणे इ. साठी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा लागतो. सन 1990 मध्ये किती वेळा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा लागला याची माहिती

जाणून घेतली असता 9 टक्के आश्रमशाळांना वर्षातून एकदा, 21 टक्के आश्रमशाळांना वर्षातून दोनदा, तर 30 टक्के आश्रमशाळांना वर्षातून तीन वेळा मात्र वर्षातून तीन पेक्षा अधिक वेळा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधणा-यांमध्ये 22 टक्के आश्रमशाळांचा समावेश असल्याचे आढळून आले.

§9§ खाजगी डॉक्टरांकडून इलाज -

प्रत्येक वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत त्वरीत वैद्यकीय मदत उपलब्ध होतेच असे नाही. काही वेळा आश्रमशाळांनी तातडीच्या वैद्यकिय मदतीसाठी खाजगी डॉक्टरांकडे संपर्क साधल्याचे आढळून आले. मागील वर्षी अशा प्रकारे शासकिय वैद्यकिय सेवा त्वरीत उपलब्ध नसल्याने 9 टक्के आश्रमशाळांना वर्षातून एकदा, 13 टक्के आश्रमशाळांना दोनदा, 17 टक्के आश्रमशाळांना तीन वेळा, खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांकडून तातडीची वैद्यकिय मदत घेतल्याचे आढळून आले.

§10§ प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत वैद्यकिय सेवा अनुपलब्धतेची कारणे -

शासकिय वैद्यकिय सेवा त्वरीत उपलब्ध न होण्याची कारणे काय असावीत हे मुख्याध्यापक तसेच वसतिगृह अधिक्षकांकडून जाणून घेतले असता -

§अ§ 18 टक्के आश्रमशाळांनी वैद्यकिय अधिकारी उपलब्ध नसतात असे सांगितले.

§ब§ 17 टक्के आश्रमशाळांनी शासकिय दवाखान्यातील औषधांचा साठा संपल्याने खाजगी डॉक्टरांकडून औषधोपचार करुन घेतले.

§क§ 31 टक्के आश्रमशाळांनी शासकिय दवाखाना दूर असल्याने तिथपर्यंत पोहोचण्यासाठी वाहन व्यवस्था नसते त्यामुळे खाजगी डॉक्टरांकडून औषधोपचार करवून घेतले.

§ड§ 24 टक्के आश्रमशाळांनी एस.टी. ची वाहतुक व्यवस्था बंद असल्याने शासकिय दवाखान्यामध्ये आजारी व्यक्तीस नेता येत नाही.

§इ§ 9 टक्के आश्रमशाळांनी सुट्टयांच्या दिवशी दवाखाना बंद असल्याने खाजगी डॉक्टरांकडे न्यावे लागत असल्याचे सांगितले. सारांश, उपरोक्त माहितीवरुन आरोग्यकेंद्र लांब असणे, वाहतुकीची गैरसोय व आरोग्य अधिकारी उपलब्ध नसल्याने बहुसंख्य आश्रमशाळांना तातडीची वैद्यकिय मदत घेण्यासाठी खाजगी डॉक्टरांकडे वैद्यकिय मदत घेतल्याचे आढळून आले.

------------

# प्रकरण क्र. 4

## निरीक्षण व निष्कर्ष

1. सहयाद्री विभागातील आश्रमशाळांमध्ये वसतिगृहात (हॉस्टेलर) राहणा-या मुलांची संख्या अधिक असल्याचे आढळून आले तर गोंडवन विभागामध्ये वसतिगृहात (हॉस्टेलर) मुलींची संख्या जास्त असल्याचे दिसून आले.

2. शासकीय आश्रमशाळात नियमानुसार पदे मंजूर असूनही काही पदे रिक्त असल्याचे आढळून आले. सहयाद्री विभागात उच्चश्रेणी प्राथमिक शिक्षकांची 23 टक्के पदे रिक्त आढळली. तर गोंडवन विभागात 3 टक्के पदे भरण्यात आलेली नाहीत. त्याचप्रमाणे मुख्याध्यापक (प्राथमिक/माध्यमिक) यांचीही पदे रिक्त असल्याचे आढळून आले. परिणामतः मंजूर पदांपैकी काही पदे न भरल्यामुळे त्याचा मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होतो.

   इतर कर्मचारी वृंद म्हणजे स्वयंपाकी/कामाठी यांचीही पदे काही प्रमाणात रिक्त असल्याचे दिसून आले. अशा परिस्थितीत दैनंदिन कामकाज सुव्यवस्थित व सुरळीतपणे पार पडण्यात अडचणी निर्माण होतात.

3. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक अंथरूण-पांघरूण, ट्रंक (पेटया), तसेच ताट, वाटी, तांब्या इ. साहित्य उपलब्ध झाल्याचे परंतु ते योग्य स्थितीत नसल्याचे व त्यातील बरेच साहित्य प्रत्यक्ष वापरण्यात येत नसल्याचे आढळून आले.

4. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य म्हणजे हॉलीबॉल, फूटबॉल तसेच खेळाच्या इतर सुविधा डबलबार/सिंगलबार पुरविण्यात आल्याचे आढळून आले.

5. क्षेत्रीय पाहणीमध्ये समाविष्ट असलेल्या 96 आश्रमशाळांपैकी केवळ 17 टक्के आश्रमशाळांमध्ये व्यायाम शिक्षकांचे काम सहाय्यक शिक्षकांपैकी प्रशिक्षित शिक्षकाकडे सोपविल्याचे आढळून आले तर 83 टक्के आश्रमशाळेत व्यायाम शिक्षक नसल्याचे आढळून आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना "शारीरिक शिक्षण" हा विषय शिकविला जात नसल्याचे आढळून आले.

6. सर्वेक्षित 96 आश्रमशाळांपैकी 41 (43 टक्के) आश्रमशाळांना कच्ची इमारत व 45 (57 टक्के) आश्रमशाळांना पक्की इमारत असल्याचे आढळून आले 10 (10 टक्के) आश्रमशाळांच्या इमारती कच्ची/पक्की इमारत अशा संमिश्र स्वरूपाच्या असल्याचे आढळून आले.

आश्रमशाळांच्या इमारती भाडयाच्या व शासकीय अशा दोन्ही प्रकारच्या असल्याचे आढळून आले.

ज्या ठिकाणी आश्रमशाळांकरिता भाडयाच्या इमारती वापरण्यात येतात तेथेही विद्यार्थ्यांसाठी पुरेशी जागा नाही अशा ठिकाणी अपु-या जागेमध्येच शिक्षणाचे कामकाज पार पाडावे लागते. जेथे आश्रमशाळांसाठी शासनाच्या इमारती आहेत तेथेही पुरेशी जागा उपलब्ध नाही. शाळेच्या वर्ग वाढीबरोबर इमारतींचे नवीन बांधकाम झालेले आढळून येत नाही.

7. आश्रमशाळांमध्ये ऑफिस (कार्यालय) स्टोअर-कोठीसाठी, शिक्षक कक्षासाठी, स्वयंपाक गृहासाठी स्वतंत्र खोल्यांची सोय करण्यात आल्याचे आढळून आले.

8. विद्यार्थ्यांच्या निवासासाठी स्वतंत्र सदनिका व शाळेसाठी स्वतंत्र खोल्या उपलब्ध असल्याचे आढळून आले.

9. सर्वेक्षित 96 आश्रमशाळांपैकी फक्त 10 (10 टक्के) आश्रमशाळांमध्ये " करमणूकगृह" उपलब्ध असल्याचे आढळून आले.

10. सर्वेक्षित आश्रमशाळांमध्ये अन्नधान्य साठविण्यासाठी स्वतंत्र कोठीगृह असल्याचे आढळून आले. 24 (24 टक्के) आश्रमशाळांना स्वतंत्र प्रयोगशाळा, 7 (7 टक्के) आश्रमशाळांना स्वतंत्र वाचनगृह, तर 3 (3 टक्के) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध असल्याचे आढळून आले.

11. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करता 96 पैका 95 (99 टक्के) आश्रमशाळांना व्यायामशाळा सोय उपलब्ध नाही. केवळ एका आश्रमशाळेलाच व्यायामशाळा सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले.

12. सर्वेक्षित आश्रमशाळेतील तृतीय श्रेणीतील 33 टक्के प्राथमिक शिक्षक/माध्यमिक शिक्षक/बालवाडी शिक्षिका, अधीक्षक यांना निवासासाठी सदनिका उपलब्ध असल्याचे आढळून आले. उर्वरित शिक्षक व कर्मचारी भाडयाच्या जागेत किंवा सोयीच्या जवळच्या ठिकाणाहून परगावाहून जा ये करत असल्याचे आढळून आले.

आश्रमशाळा ही निवासी शाळा असल्याने आश्रमशाळेतील शिक्षकवृंदाकरिता स्वतंत्र निवासस्थाने पुरविण्याची अपेक्षा आहे. तथापि कर्मचा-यांच्या प्रमाणात निवास व्यवस्था करण्यात आलेली नाही असे दृष्टोत्पत्तीस आले.

13. सर्वेक्षित 96 आश्रमशाळेपैकी फक्त 36 (37 टक्के) आश्रमशाळेत विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व स्नानगृह उपलब्ध असल्याचे आढळून आले. परंतु पाण्याअभावी व इतर अडचणींमुळे बहुसंख्य आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या स्वच्छतागृह व स्नानगृहाचा वापर करता येत नाही असे आढळून आले.

14. क्षेत्रीय पहाणीवरे असे निदर्शनास आले की मुलींसाठी स्वतंत्र स्त्री कर्मचाऱ्याची नेमणूक केली जात नाही. परंतु 67 (70 टक्के) आश्रमशाळांमध्ये बालवाडी शिक्षिका रात्रपाळीसाठी मुलींची देखभाल करीत असल्याचे आढळून आले.

15. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना व्यायामासाठी खेळाचे साहित्य पुरविण्यात आल्याचे दिसून येते असे असूनही 96 आश्रमशाळांपैकी 61 आश्रमशाळांना (64 टक्के) विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडांगण सुविधा उपलब्ध नसल्याचे आढळून आले.

16. दृक्श्राव्य माध्यमांचा प्रभावी वापर अध्यापनामध्ये होऊ शकतो असे असूनही क्षेत्रीय पहाणीमध्ये फक्त 21 टक्के आश्रमशाळांमध्ये दूरदर्शन संच, 1.25 टक्के आश्रमशाळांमध्ये रेडिओ हा दृक्श्राव्य साधने आढळून आला.

17. सर्वेक्षित आश्रमशाळांपैकी 76 टक्के आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्राथमिक उपचारासाठी सोय उपलब्ध असल्याचे आढळून आले.18.
आश्रमशाळांतील शैक्षणिक व अध्यापना व्यतिरिक्त राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाबाबत असे दिसून आले की, 16 टक्के आश्रमशाळांमध्ये स्काऊट गाईड, 9 टक्के आश्रमशाळांमध्ये बॅण्ड पथक, 7 टक्के आश्रमशाळांमध्ये हस्तकला, 4 टक्के आश्रमशाळांमध्ये वीरबाला व बालवीर पथक, तसेच 68 टक्के आश्रमशाळांमध्ये "राष्ट्रीय भावना जागृती" कार्यक्रम राबविले जात असल्याचे आढळून आले. परंतु एकंदरीतरित्या विचार करता शैक्षणिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त राबविण्यात येणारे उपक्रम फारच कमी आश्रमशाळेतून आणि थोड्या संख्येने राबविण्यात येतात.

19. व्यवसाय प्रशिक्षण व एन.सी.सी.हे दोन्ही उपक्रम कोणत्याही आश्रमशाळेत राबविले जात नसल्याचे आढळून आले.

20. शासकीय सर्व आश्रमशाळांना ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. सदर ग्रंथालयामध्ये मासिके व इतर साहित्य (गोष्टींची पुस्तके) उपलब्ध असल्याचे आढळून आले. नियमित वर्तमानपत्रे या शाळात उपलब्ध होत नाहीत.

21. शासकीय आश्रमशाळांतील भौतिक सुविधांबाबत असे आढळून आले की,

अ) 64 टक्के आश्रमशाळांना नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत असल्याचे आढळून आले.

ब) 80 टक्के आश्रमशाळांना वीजेची सोय उपलब्ध असल्याचे आढळून आले.

क) 68 टक्के आश्रमशाळांना बारमाही रस्त्याची सोय उपलब्ध असल्याचे आढळून आले तर 32 टक्के आश्रमशाळांना पावसाळयात वाहतूक व्यवस्था बंद पडल्याने दळणवळणाची गैरसोय सहन करावी लागते.

ड) सर्वेक्षित शासकीय आश्रमशाळांपैकी 100 टक्के आश्रमशाळांमध्ये स्वयंपाकासाठी सरपण व लाकडे यांचा वापर केला जात असल्याचे आढळून आले.

इ) सर्वेक्षित आश्रमशाळांपैकी 96 टक्के आश्रमशाळांमध्ये टेबल, खुर्च्या तर 84 टक्के आश्रमशाळांमध्ये पंखे, 57 टक्के आश्रमशाळांमध्ये घडयाळ, 87 टक्के आश्रमशाळांमध्ये रॅक्स व कपाटे तर 37 टक्के आश्रमशाळांना कुंपण (कंपाउंड) पुरविण्यात आल्याचे आढळून आले.

फ) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वापरासाठी फक्त एका आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना चपला पुरविल्या गेल्याचे दिसून आले तर 11 टक्के आश्रमशाळांमध्ये स्कूल बॅग व 22 टक्के विद्यार्थ्यांना पेटीला (ट्रंकेला) लावण्यासाठी कुलपे पुरविण्यात आली असल्याचे आढळून आले.

ग) आश्रमशाळेतील कोठातील धान्य चांगले व सुरक्षित राखण्यासाठी 21 टक्के आश्रमशाळांना जंतुनाशके व औषधे पुरविण्यात आल्याचे आढळून आले.

ह) आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांना आर्थिक स्वयंपूर्णता कितपत आहे हे जाणून घेतल्यावर असे आढळून आले की, रु.200/- रु.500/- रु.1000/- पर्यंत 38 टक्के आश्रमशाळांतील मुख्याध्यापकांना आर्थिक स्वयंपूर्णता असल्याचे आढळून आले. उर्वरित 62 टक्के आश्रमशाळांना आर्थिक स्वयंपूर्णता नसल्याचे आढळून आले. सदर आर्थिक स्वयंपूर्णता औषधोपचार, वस्तू खरेदी, आकस्मिक खर्च इ. कारणासाठी उपलब्ध असल्याचे मुख्याध्यापकांकडून समजले.

22. सर्वेक्षित आश्रमशाळांच्या माहिती पृथःक्करणातून 67 टक्के आश्रमशाळांना 1 ते 5 कि.मी. अंतराच्या आत एस.टी. बस सेवा उपलब्ध असल्याचे आढळून आले. तर 33 टक्के आश्रमशाळांना 20 कि.मी. अंतरापुढे बस व्यवस्था उपलब्ध होते असे आढळून आले.

23. 24 टक्के आश्रमशाळांना टेलिग्राम सुविधा-सेवा 20 कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर उपलब्ध आहे. परंतु उर्वरित आश्रमशाळांना 10 कि.मी. पर्यंत टेलिग्राम सेवा उपलब्ध आहे. 67 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी. अंतरापर्यंत पोस्ट ऑफिसची सोय उपलब्ध आहे तर उर्वरितांना त्यापेक्षा जास्त अंतरावर उपलब्ध होते.

24. 37 टक्के आश्रमशाळांना बाजारपेठेची सोय 20 कि.मी. च्या पुढे उपलब्ध होऊ शकते तर 63 टक्के आश्रमशाळांना ती सोय 20 कि.मी. अंतरापर्यंत उपलब्ध असल्याचे आढळले.

25. 32 टक्के आश्रमशाळांना बँक सुविधा सर्वसाधारणपणे 1 ते 5 कि.मी. अंतरापर्यंत उपलब्ध असल्याचे आढळून आले. उर्वरित 68 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर सदर सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले.

26. प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा 37 टक्के आश्रमशाळांना 5 कि.मी. अंतराच्या आत उपलब्ध असल्याचे आढळून आले. उर्वरित 63 टक्के आश्रमशाळांना ही सुविधा 5 कि.मी. अंतराच्यापुढे उपलब्ध होऊ शकते असे आढळून आले.

27. 63 टक्के आश्रमशाळांना 1 ते 5 कि.मी. लांबीच्या जोड रस्त्याची सोय उपलब्ध असल्याचे दिसून येते, 18 टक्के आश्रमशाळांना सदर सुविधा 20 कि.मी.च्या पुढे तर 19 टक्के आश्रमशाळांना 5 ते 20 कि.मी. लांबीच्या जोड रस्त्यांची सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले.

28. 93 टक्के आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी झाल्याचे आढळून आले. पैकी 30 टक्के आश्रमशाळेत एकदा, 40 टक्के आश्रमशाळांत दोनदा तर 23 टक्के आश्रमशाळेमध्ये वर्षातून तीनदा विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी केल्याचे आढळून आले. आरोग्य तपासणी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सह्याद्री विभागातील विद्यार्थ्यांची संख्या अधिक आढळली.

29. आश्रमशाळेला वैद्यकीय कारणास्तव भेट देणा-या अधिका-यांमध्ये 92 टक्के वैद्यकीय अधिकारी असल्याचे आढळून आले.. उर्वरितामध्ये कुष्ठरोग पर्यवेक्षक अधिकारी, नर्स (परिचारिका) मलेरिया डॉक्टर यांचा समावेश आढळला.

30. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या किरकोळ आजारासाठी साथीचे रोग, त्वचारोग यासंबंधी औषधासाठी योजना :

- सर्दी, पडसे, डोकेदुखी, इ. बाबत औषधांचा साठा 27 टक्के आश्रमशाळांमध्ये आढळला.

- थंडा, ताप, खोकला यासाठी औषधे 39 टक्के आश्रमशाळांमध्ये आढळली.
- डोळ्यांचे विकारासाठी औषध साठा 36 टक्के आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असल्याचे आढळले.
- त्वचारोगावरील इलाज करण्यासाठी औषधे 44 टक्के आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असल्याचे दिसून आले.
- साथीचे रोग, जुलाब इ. बाबत इलाज करण्यासंबंधी औषधांची सोय 40 टक्के आश्रम शाळांमध्ये उपलब्ध असल्याचे आढळून आले.
- दातांचे विकास व अशक्तपणा यावर उपाय करण्यासाठी 18 आश्रमशाळांमधून औषध योजना केल्याचे आढळून आले.

31. 6 टक्के आश्रमशाळांमध्ये प्रथमोपचार पेटी उपलब्ध असल्याचे आढळून आले. उर्वरित 94 टक्के आश्रमशाळांमध्ये प्रथमोपचार पेटी नसल्याचे आढळून आले.

32. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आजारपणात प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधणा-या आश्रमशाळांचे वर्गीकरण त्यांनी केलेल्या प्रयत्नाप्रमाणे करण्यात आले. त्यामध्ये 9 टक्के आश्रमशाळांना वर्षातून एकदा, 24 टक्के आश्रमशाळांनी वर्षातून दोनदा तर 30 टक्के आश्रमशाळांनी वर्षातून तीन वेळा व त्यापेक्षा अधिक वेळा संपर्क साधला.

33. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत शासकीय आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना आरोग्य सेवा उपलब्ध न होण्याची कारणे तपासली तेव्हां असे आढळून आले का,-

- 18 टक्के आश्रमशाळांना वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसतात.
- 31 टक्के आश्रमशाळा सदर दवाखाना दूर अंतरावर,
- 34 टक्के आश्रमशाळांना एस.टी.बस सेवा बंद,
- 9 टक्के आश्रमशाळांना सुट्टीच्या दिवशी दवाखाना बंद असल्याचे आढळून आले.

34. 56 टक्के आश्रमशाळांत आजारी विद्यार्थ्यांस डॉक्टर तपासणीसाठी आश्रमशाळेत येत असल्याचे आढळले, तर 40 टक्के आश्रमशाळांमध्ये आजा-यास डॉक्टरकडे घेऊन जात असल्याचे आढळून आले. फक्त 4 टक्के आश्रमशाळांनी विद्यार्थी आजारी पडल्यावर घरी पाठवून देण्यात येत असल्याचे सांगितले तसेच कोणताही औषधोपचाराची सोय केली जात नसल्याचे आढळले.

35. 9 टक्के आश्रमशाळांनी वर्षातून एकदा, 13 टक्के आश्रमशाळांना दोनदा, 17 टक्के आश्रमशाळांना दोन/तीन वेळा खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांकडून तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन घेतल्याचे आढळून आले.

....

## प्रकरण क्र. 5

## सूचना तथा शिफारशी -

### 5.1 आश्रमशाळेसाठी इमारत व्यवस्था :

आश्रमशाळा प्रामुख्याने वन व दुर्गम विभागात आहेत. अशा प्रदेशात इमारतींचा प्रश्न विशेषत्वाने जाणवतो. आदिवासींच्या कुडाच्या व छपराच्या झोपड्या शिवाय इतर निवासाची व्यवस्था असत नाही. अगोदरच आदिवासींच्या राहण्याचा प्रश्न, त्यांची असतील ती गुरेढोरे बांधण्यास अपुरी जागा अशा भागात आश्रमशाळा सुरु केल्याने इमारतींचा यक्ष प्रश्न उभा राहतो. काही आश्रमशाळा तर अक्षरशः गुरांच्या गोठयात भरविल्या जातात. ही अत्यंत दयनीय अशी अवस्था आहे. म्हणून आश्रमशाळा काढण्यापूर्वी तेथे प्रथमतः इमारतीचा महत्वाचा प्रश्न सोडवावा लागतो. एकतर नवीन इमारती बांधण्यात येऊन आश्रमशाळा उघडण्यात यावी किंवा आश्रमशाळा उघडावयाच्या ठिकाणी भाडयाने चांगली पुरेपूर इमारत मिळत असेल तर ती घेऊन नंतरच आश्रमशाळा सुरु करावी.

### 5.2 शिक्षक, अध्यापक वर्गासाठी स्वतंत्र खोली/बैठक व्यवस्था :

आश्रमशाळेतील शिक्षकांना शाळा सुटण्यापूर्वी किंवा मध्यंतरात एकतर वर्गात बसावे लागते किंवा शाळेबाहेर कसातरी वेळ घालवावा लागतो. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेबद्दल चर्चा, अभ्यास, चिंतन, मनन करण्यास त्यांना स्वस्थता नाही. याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होणे स्वाभाविकच आहे. तेंव्हा शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था असावी, म्हणजे त्यांचे अध्यापन प्रभावी होण्यास मदत होईल.

### 5.3 ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोलीची सोय -

ग्रंथालय म्हणजे शाळांचा जणू आत्माच आहे. त्यांची जपणूक, व्यवस्थापन, त्यांची वाढ होणे महत्वाचे आहे. शाळेतील अभ्यासाइतकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्व वाचनाला आहे. विद्यार्थ्यांची दृष्टी प्रगल्भ व विस्तारित होण्यास त्याला अभ्यासेतर वाचन आवश्यक आहे. म्हणून शाळेतच एक स्वतंत्र खोली ग्रंथालयास उपलब्ध असणे आवश्यक आहे.

5.4 स्वच्छतागृहाची स्वतंत्र सोय (मुलां/मुलींसाठी) -

शिक्षणाइतकेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे महत्व असते. अद्यापही आश्रमशाळेची मुले जवळच्या नदी नाल्याच्या ठिकाणी प्रातःविधी व स्वच्छतेसाठी जातात. शहरी वातावरणाप्रमाणे त्यांना स्वच्छतागृहाची सोय नाही. कारण स्वच्छतागृहांची सोय ब-याचश्या आश्रमशाळेत करण्यात आलेली नाही. म्हणून आश्रमशाळेत मुलांसाठी वेगळी व मुलींसाठी वेगळी अशी स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.

5.5 स्वयंपकगृह व धान्य कोठीसाठी स्वतंत्र व्यवस्था :

स्वयंपकगृह, धान्याची साठवण यांची व्यवस्था ही एका ठिकाणी केल्याचे काही ठिकाणी दिसून येते. स्वयंपकगृहे आरोग्याच्या दृष्टीने सोयीची असावीत. कोठीची व्यवस्था पक्क्या बांधलेल्या खोलीत व पुरेशी असावी. कारण सहा महिन्याकरता लागणारे अन्न धान्य व इतर साहित्य साठवून ठेवावे लागते. कोठीची योग्य व्यवस्था नसेल तर अन्नधान्याची नासाडी होणे अपरिहार्य आहे.

5.6 आश्रमशाळेला वीज पुरवठा अत्यावश्यक -

वीज हे उत्कर्षाचे प्रतीक आहे. अद्याप आदिवासींच्या अनेक खेडयात वीजेचा प्रवेश नाही. आश्रमशाळांही आदिवासींच्या संस्काराचे केंद्र आहे. आदिवासींच्या झोपडीपर्यंत नसेल तर कमीतकमी आश्रमशाळेत तर वीज येणे आवश्यक आहे. आदिवासी भागात रॉकेलचाही पुरवठा योग्य प्रमाणात होत नाही. कित्येक वेळा आदिवासी विद्यार्थ्यांना जेवण-खाणे अंधारातच आटोपून घ्यावे लागते. त्यासाठी प्राधान्याने आश्रमशाळांना वीज पुरविण्यात आली पाहिजे.

5.7 आश्रमशाळांची देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमासाठी पाहणी -

आश्रमशाळेच्या इमारती काही वेळा मोडके-तोडके पडक्या, अर्धवट बांधलेल्या गळक्या अवस्थेत राहतात. त्यामुळे वरुन ऊन येते व पावसाळयात पावसाचे थेंब पडतात. अशाच अवस्थेत विद्यार्थी विद्यार्जन करीत असतात. ही परिस्थिती बदलली पाहिजे. त्यासाठी दुरुस्तीसाठी जिल्हयाच्या कार्यकारी अभियंत्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात यावी. प्रत्येक वर्षी आश्रमशाळांच्या इमारतींची पाहणी करण्यात यावी व आवश्यकतेनुसार दुरुस्ती त्वरीत करण्यात यावी.

2. आश्रमशाळेकरिता शिक्षकवृंद -

5.8 प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक -

आश्रमशाळेवर शिक्षकांची नेमणूक करतांना प्रशिक्षित आदिवासी शिक्षकांची नेमणूक करण्यात यावी. कारण आदिवासी शिक्षकांना आदिवासी भागात राहणे विशेष गैरसोईचे वाटत नाही. कारण त्यांची त्या भागातील वातावरणात वाढ झालेली असते. ते आपल्याच भागाशी लवकर समरस होऊ शकतात. त्यामुळे त्यांचेकडून अध्यापनाचे कार्य व्यवस्थित होऊ शकेल. शास्त्र, गणित, इंग्रजी या विषयांसाठी आदिवासी प्रशिक्षित शिक्षक मिळत नसतील तर इतर जमातीचे प्रशिक्षित शिक्षक नेमावेत. स्थानिक शिक्षकाला त्याच गावच्या शाळेत नेमणे उचित होणार नाही.

5.9 आश्रमशाळेतील शिक्षणही सर्वसाधारणपणे शिक्षणाच्या स्तरापेक्षा कमी असू नये. यासाठी आदिवासी जमातीतील पात्र व प्रशिक्षित शिक्षक मिळत नसतील तर बिगर आदिवासी शिक्षकांचाही नेमणूक करण्यास हरकत नसावी.

5.10 शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण -

आश्रमशाळेतील शिक्षकांना जिल्ह्यांच्या शिक्षण अधिकाऱ्याकडून व निरनिराळ्या खाजगी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गाचा लाभ सुट्ट्यांचे वेळी करून देण्यात यावा. दिपावली व उन्हाळा या सुट्ट्यांत आश्रमशाळेतील शिक्षकांना संबंधित विषयांचे मर्यादित कालात प्रशिक्षण देण्यात यावे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल.

5.11 शैक्षणिक वर्षाअखेरच शिक्षकांच्या बदल्या -

आश्रमशाळांतील शिक्षकांच्या बदल्या, इतर शाळेतील शिक्षकांच्या बदल्याप्रमाणे होणे आवश्यक असते. पण कित्येक वेळा शैक्षणिक वर्षातच शिक्षकांच्या बदल्या होतात. त्यामुळे विशिष्ट वर्गाचा अभ्यास दुसऱ्या शिक्षकाला पूर्ण करणे कठीण जाते. तसेच बदली झाल्यानंतर कित्येक वेळा बदलीच्या ठिकाणी लवकर शिक्षक रुजू होत नाहीत. त्यामुळे तर विद्यार्थ्यांचे फारच नुकसान होते. म्हणून सर्वसाधारणपणे शैक्षणिक वर्षाअखेर शिक्षकांच्या बदल्या करण्यात याव्यात. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने तसे धोरण राबविणे गरजेचे वाटते.

5.12 बिगर आदिवासी शिक्षकांसाठी उत्तेजनार्थ सवलती -

आदिवासी विभागातील आश्रमशाळेवर आदिवासी शिक्षकांशिवाय इतर शिक्षक जाण्यास तयार नसतात. त्यासाठी बिगर आदिवासी शिक्षकांचा आश्रमशाळेवर नेमणूक करीत असताना विशेष सवलती उदा. विशेष भत्ता, अशा सवलती देण्यात याव्यात म्हणजे बिगर आदिवासी शिक्षकही आदिवासी भागात काम करण्यास तयार होतील. तसेच अध्यापनाचे काम मनापासून करतील.

3. आश्रमशाळेतील विद्यार्थी हजेरी :

5.13 शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी शिक्षक पालक संघ स्थापना -

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक-पालक संघ हे विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत. असे संघ विद्यार्थ्यांचे आणि शैक्षणिक अडीअडचणींचा विचार करून शैक्षणिक दर्जा उंचावण्यास हातभार लावू शकतात. शिक्षणातील होणारी गळती व कुचंबणा ते थांबवू शकतात. परस्परांच्या सामंजस्याने विचारांच्या देवाणघेवाणीने शैक्षणिक प्रश्न सुटण्यास मदत होते. आदिवासी विभागात तर अशा प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे. आदिवासी पालक प्रथमतःच शिक्षणाबाबत उदासीन, त्यामुळे त्याला शिक्षणाचे महत्व सातत्याने समजावून देणे आवश्यक ठरते. त्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेऊन शिक्षक पालक संघाची स्थापना प्रत्येक आश्रमशाळेत करावी व वर्षातून कमीतकमी दोन सभा घ्याव्यात.

5.14 अभ्यासक्रम गोष्टीरूप स्वरूपात शिकविण्यावर भर -

निसर्गाशी समरस झालेला व मुक्त जीवन जगत असलेला आदिवासी विद्यार्थी चार भिंतीत बसून मुळाक्षरांचे पाठ घेण्याच्या मनःस्थितीत नसतो. पाखराप्रमाणे स्वतंत्रपणे खेळावे, बागडावे, मिळेल त्या प्राण्याची व पक्षाची शिकार करावी. फळे-कंदमुळे मिळेल ते घरी आणावे, खावे, अशा दिनक्रमात रमणारी आदिवासी मुले आश्रमशाळेत 6 तास बसण्यास साहजिकच कंटाळतात. तशातच रटाळवाणे आणि पंतोजी पध्दतीचे शिक्षक भेटले तर मग त्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कायमचाच सुटला म्हणावा लागेल म्हणून शिक्षकांनी क्रमिक पुस्तकापेक्षाही गोष्टीरूप रामायण, महाभारत आणि अशा पुष्कळ प्रकारच्या गोष्टी सांगून विद्यार्थ्यांचे मन शिक्षण घेण्यायोग्य करावे. अभ्यासक्रमाचा बराच भाग गोष्टीरूप पध्दतीने शिकविणे शक्य आहे, तसा प्रयत्न व्हावा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात रंजकता निर्माण होईल व "मनोरंजनातून ज्ञानदान" हा शिक्षणाचा सिध्दांत साध्य होईल.

5·15 शाळा सुरु होतानाच शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना देणे गरजेचे -

सर्वसाधारणपणे शैक्षणिक वर्षाची सुरवात जूनपासून होते. त्यापूर्वी विद्यार्थ्यांना पाटी-पुस्तके, वह्या त्यांचा गणवेष, अंथरुण पांघरुण ह्या बाबी मिळणे अत्यंत आवश्यक असतात. परंतु तसे न होता दिनांक 15 ऑगस्ट किंवा 26 जानेवारी पर्यंत देखील विद्यार्थ्यांना काही आश्रमशाळेत गणवेष दिला जात नाही. तसेच वह्या देखील शाळा सुरु झाल्यावर लगेच दिल्या जात नाहीत. यात निश्चितपणे सुधारणा होणे आवश्यक आहे. वर्षाच्या सुरवातीस सर्व शैक्षणिक व इतर साधनांची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मनही लागेल व तो सातत्याने वर्गात हजर राहू शकेल.

4. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी व्यवस्था -

5·16 सर्वसाधारणपणे शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक तपासणीप्रमाणे प्रत्येक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा वर्षातून एकदा तरी शारीरिक तपासणी होणे आवश्यक आहे. आदिवासी भागात जाण्यास रस्ते कमी असतात. काही ठिकाणी तर मोठ्या त्रासाने जावे लागते. तशा ठिकाणी राहणारे आश्रमशाळेचे विद्यार्थी त्यांच्या राहण्याच्या, स्वच्छतेच्या, पिण्याच्या पाण्याच्या अभावातून उद्भवणा-या सांसर्गिक किंवा अनुवांशिक रोगाचे प्रमाण हे तितकेच भयावह असू शकते. अनुवांशिक व संसर्गजन्य दोन्ही प्रकारचे रोग इंजेक्शन किंवा इन्याक्युलेशनने नाहिसे करता येतात. हे रोगच जर समजू शकले नाहीत तर वाढण्याचा धोका अधिक असतो. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा शारीरिक तपासणी होणे व स्थानिक परिस्थितीनुसार उद्भवणा-या सांसर्गिक किंवा नैसर्गिक आजारापासून बचाव होण्यासाठी योग्य वैद्यकिय मदत होणे आवश्यक आहे.

आरोग्य विभागाच्या सूचना असून देखील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करीत नाहीत. जेथे आश्रमशाळा प्राथमिक आरोग्य केंद्रापासून अति दूर अंतरावर असेल अशा ठिकाणी "मानसेवी/मानद वैद्यकिय अधिकारी" (ऑनररी मेडिकल ऑफिसर) यांची नियुक्ती करण्यात यावी.

